संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 4 | Issue : 3 | Marathi Monthly | Thane, 1 September 2026 to 30 September 2026 | Pages 16 | Price : 10/-

## भर पावसात तिरंगा रॅली

### पावसात भिजत उत्साहात साजरा झाला भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन!



**ठाणे – भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त, ठाणे जिल्हा शिवसेनेच्या वतीने शहरातील चंदनवाडी शिवसेना शाखेत १४ ऑगस्टच्या मध्यरात्री स्वातंत्र्यदिनाचा सोहळा मोठ्या दिमाखात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भर पावसात तिरंगा रॅली काढण्यात आली. मुसळधार पावसाची तमा न बाळगता शिवसैनिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उत्साहाने या रॅलीत सहभागी झाले. ...पृष्ठ क्र. ३ वर

# ‘धर्मराज्य पक्ष’तर्फे ठाणे मनपाच्या प्रस्तावित करवाढीविरोधात शांततामय आंदोलन

## लेखापरीक्षण अहवाल, नियोजनबद्ध वाहनतळाची मागणी; ‘ठाणे क्लस्टर विकास कंपनी’च्या प्रस्तावावरही सवाल!




**ठाणे – दि. १७ ऑगस्ट २०२६ : ठाणे महानगरपालिकेच्या प्रस्तावित मालमत्ता कर व मालमत्ता हस्तांतरण शुल्कवाढीविरोधात तसेच सन २०२४–२५ व २०२५–२६ चे लेखापरीक्षण अहवाल जाहीर करावेत, थकीत महसुलाची प्रभावी व कालबद्ध वसुली करावी, विकास आराखड्यातील वाहनतळासाठी सुविधा भूखंडांचा वापर करून नियोजनबद्ध वाहनतळ निर्माण करावेत आणि रस्त्यावरील धोकादायक पार्किंगसंदर्भातील ठराव रद्द करावा, या मागण्यांसाठी ‘धर्मराज्य पक्षातर्फे’ सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी ठाणे महानगरपालिकेच्या महासभेच्या दिवशी परमार्थ निकेतनजवळ शांततामय आंदोलन करण्यात आले.**

महानगरपालिकेने सन २०२६–२७चा अर्थसंकल्प सादर करताना करवाढ न करता GIS तंत्रज्ञानाद्वारे मालमत्ता शोधून महसूल वाढविण्याची भूमिका मांडली होती. मात्र, त्यानंतर मालमत्ता करासह हस्तांतरण शुल्कवाढीचा प्रस्ताव पुढे आल्याने आधी थकीत महसूल वसूल करा, महसूल गळती रोखा आणि त्यानंतरच करवाढीचा विचार करा, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. ‘‘करवाढ नको, न्याय हवा! आर्थिक बोजा नको, पारदर्शक कारभार हवा! टॅक्स आमचा, पैसा आमचा! हिशोबही आम्हालाच हवा!’’ अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. ...पृष्ठ क्र. ३ वर

## संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**ठाणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त कोर्ट नाका, अशोक स्तंभ, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित करण्यात आलेल्या भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाच्या कार्यक्रमास धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष मा. राजन राजे यांच्यासह धर्मराज्य पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.** ...पृष्ठ क्र. ३ वर



## अंशुल इनोव्हेटिव्ह केमिस्ट्रीच्या संपकरी कामगारांच्या लढ्याला कामगार ऐक्याची भक्कम साथ!

....पृष्ठ क्र. ३ वर



अंतरंग



अंधश्रद्धेच्या अंधाराकडून विवेकाच्या प्रकाशाकडे
पृष्ठ क्र. ४



‘पीडित मानसिकते’चं राजकारण
- अमिता नीरव
पृष्ठ क्र. ६




या ‘Gen-Z’ पिढीने गती प्राप्त करुन दिलीय...!!!
...राजन राजे
पृष्ठ क्र. ८




शाळा की कुंभमेळा?
प्रशांत जोशी.
पृष्ठ क्र. ११

# गोली नहीं, गाली पर जवाबदेही क्यों?



जेव्हा देशाला गृहमंत्र्यांकडून हे जाणून घ्यायचे आहे की, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गोळ्या आणि छर्रे झाडण्याचे आदेश कोणी दिले, तेव्हा पंतप्रधान पुन्हा शिवीगाळीबद्दल आरडाओरडा करत आहेत! गोली के बजाय गाली पर बात!

यापूर्वी त्यांनी म्हटले होते की, त्यांना रोज मोठ्या प्रमाणात शिवीगाळ ऐकण्याची सवय आहे आणि खरं तर त्यांना शिवीगाळीतूनच शक्ती मिळते. मग आता काही आंदोलकांनी वापरलेल्या भाषेवरून एवढा गदारोळ का? एफआयआर दाखल करून मग 'माफी' देण्याबद्दल आणि 'गैरसमज झालेल्या तरुण महिलांना' पुन्हा मार्गावर आणण्याबद्दल का बरं बोलायचे?

ही तीच जुनी युक्ती आहे. विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायावरून आणि सरकारच्या उत्तरदायित्वाच्या अभावावरून लक्ष हटवून ते पंतप्रधानांवर वैयक्तिकरीत्या केंद्रित करायचे. जर मोदींनी प्रत्येक गोष्ट स्वतःभोवती फिरवली आहे–अगदी स्वतः ला देवाचा 'गैर-जैविक प्रतिनिधी' म्हटले आहे–तर त्यांच्या सरकारच्या उघड अकार्यक्षमतेविरुद्ध आणि अपयशाविरुद्धचा रोष त्यांच्यावरही रोखला जाईल.

त्यांना शिवीगाळीबद्दल बोलू द्या; आपण उत्तरदायित्वावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

गाली नहीं, गोली पर जवाबदेही तय हो!

*– दीपंकर भट्टाचार्य*

## ''सर्व थरांतल्या लोकप्रतिनिधींची मुलं सरकारी शाळेतच शिकली पाहिजेत असा केंद्रीय कायदा केल्याशिवाय सरकारी शाळांची परिस्थिती सुधारणार नाही....''

''स्कूल ठीक करो'', या सध्या CJP च्या सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर... अलाहाबाद उच्च न्यायालयाने २०१६-१७ मध्ये दिलेला निर्णय!

''सरकारी अधिकाऱ्यांनी, लोकप्रतिनिधींनी आपली पोरं सरकारी शाळेतच टाकावी''... अलाहाबाद उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय, भारतातल्या सर्व सरकारी शाळांसाठी खरंतर अतिशय उपयुक्त व क्रांतिकारक आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने १८ ऑगस्ट २०१५ रोजी Shiv Kumar Pathak  Others v. State of U.P.  Others, Writ-- No. 57476 of 2013 या प्रकरणात उत्तर प्रदेशातील सरकारी प्राथमिक शाळांच्या दयनीय स्थितीवर गंभीर चिंता व्यक्त केली.

न्यायालयाने उत्तर प्रदेशच्या मुख्य सचिवांना निर्देश देताना सरकारी कर्मचारी, अर्धसरकारी कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी, लोकप्रतिनिधी, न्यायव्यवस्थेतील व्यक्ती आणि सार्वजनिक निधीतून वेतन/लाभ घेणाऱ्या व्यक्तींच्या प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांना... 'उत्तर प्रदेश प्राथमिक शिक्षण मंडळा'च्या सरकारी शाळांमध्ये शिकवण्याच्या दिशेने आवश्यक पावले उचलण्यास सांगितले.

न्यायालयाचे मूलभूत तर्क स्पष्ट होते–ज्यांच्या निर्णयांमुळे सरकारी शाळा चालतात, त्यांची स्वतःची मुलेही त्याच शाळांमध्ये शिकली तर त्या शाळांतील शिक्षण, पायाभूत सुविधा, स्वच्छता, शिक्षक आणि इतर सुविधांकडे प्रशासन अधिक गांभीर्याने पाहील.

न्यायालयाने या उद्देशासाठी नियमभंग करणाऱ्यांवर आर्थिक दंडासारख्या तरतुदी करण्याचाही विचार करण्यास सांगितले.

मूळ निर्णय:
"Allahabad High Court - Shiv Kumar Pathak, Writ- No. 57476/2013" (https://reference-url-citation.invalid/4)
निर्णयाचा PDF/प्रत:
"Judgment PDF/Document - Allahabad High Court" (https://reference-url-citation.invalid/5)

# भाषा नाही, निषेध टोचतोय; खुपतोय!
## या शब्दांमध्ये अश्लीलता कोणी घुसवली?

**सॅनिटरी पॅड, डायपर, कंडोम आणि त्याच्याशी निगडित लैंगिकतेचा जाहीरपणे पोस्टर्सवर उल्लेख करणारी, तथाकथित ''अपशब्दां''ची ग्राफिती भिंतीवर आणून निषेध करणारी जनरेशन बहुधा आपल्या देशात पहिलीच असणार.**

याचे स्वागत तरुण पिढीने उत्साहाने केले; पण याला सामोरे कसे जावे, याविषयी पार गोंधळून जाऊन चीड-संताप करणारी संस्कारी, संस्कृतीरक्षकांची जुनी पिढी आपल्या देशाला फार परिचित आहे. तीच नीतीमान वाटते.

**सॅनिटरी पॅड, डायपर, कंडोम वगैरे साधनांमध्ये अश्लीलता कोणी घुसवली? ज्या लैंगिकतेचा आणि लैंगिक अवयवांचा उघड उल्लेख करून, इंग्रजी-हिंदी स्लॅन्गमध्ये नेत्यांचा, सत्ताधारी पक्षाचा आणि धर्मांध संघटनांचा उद्धार केला गेला, त्या लैंगिक अवयवांमध्ये अश्लीलता कोणी पेरली?**

योनी-लिंग यांचा उपयोग करून मुले जन्माला घालून, त्याच मार्गांमध्ये घाण कोणी घातली? त्या अवयवांचा उल्लेख शिव्यांमध्ये करण्याचा उद्योग कोणी सुरू केला? त्या अवयवांबाबत मुला-मुलींच्या मनात लहानपणापासून लज्जा, घृणा कोणी निर्माण केली? अशा शिवीयुक्त भाषेचे संस्कार तरुण पिढीवर कोणी केले?

पॉर्न उद्योगात कोट्यवधी डॉलर्स कोणाचे गुंतलेले आहेत? त्यातील पटकथा कोण लिहिते? पॉर्न कंपन्या कोणाच्या मालकीच्या आहेत?

बाईच्या शरीराचे राजरोस वस्तूकरण करणारी प्रसारमाध्यमे, सोशल मीडिया आणि सिनेमा कोण चालवते? कोणती पिढी?

या पिढीबाबत सबको मालूम है...

पॅड, डायपर, कंडोम इत्यादी अतिशय उपयोगी साधने आणि मुळात उन्नत, उत्कट, सुंदर असलेल्या शृंगार व लैंगिकतेशी संबंधित शब्द आणि रूपके जेन-झीने पोस्टरवर आणली आणि निषेध केला.

कोणाचा? निर्घृण, उद्दाम सत्तेचा!!

काय बिघडलं?

भाषा नाही, तर अंकल-आंटींना निषेध टोचतोय; खुपतोय.

*– मोहन देस*

## वे फिर आएँगे

लाठी-डंडे बरसेंगे
आँसू गैस के गोले छोड़े जाएँगे
पैलेट गन दागी जाएगी
लोहे के जूतों से
सड़कों की छाती कुचली जाएगी
वे फिर आएँगे
हेलमेट, ढाल और आदेश लेकर
मानो लोकतंत्र नहीं
किसी युद्धभूमि पर उतरे हों.

वे समझते हैं
कि खोपड़ियाँ फोड़ देने से
विचार मर जाते हैं
कि आँखें छलनी कर देने से
सपने अंधे हो जाते हैं
उन्हें कौन बताए
इतिहास की आँखों पर
कभी पैलेट गन का असर नहीं हुआ.

जितनी बार
लाठी उठी है जनता पर
उतनी ही बार
सत्ता की नैतिक पराजय लिखी गई है.

खून के धब्बे
बारिश से धुल जाते हैं
पर अन्याय के दाग
पीढ़ियाँ याद रखती हैं
हर घायल छात्र
हर लहूलुहान नौजवान
हर काँपती हुई माँ
हर बेचैन पिता
लोकतंत्र की अधूरी इबारत हैं.

तुम जितनी चाहे
बाड़ें खड़ी कर लो
सड़कों को कँटीले तारों से बाँध लो
आवाज़ों को अपराध घोषित कर दो
अख़बारों में सच की जगह
विज्ञापन छाप दो.

फिर भी
एक दिन
किसी विश्वविद्यालय की सीढ़ियों पर
किसी गाँव की चौपाल में
किसी कारखाने के फाटक पर
किसी किसान की मेड़ पर
कोई फिर कहेगा
जितना चाहे जुल्म करो
मौजूद हमारे सर हैं
सीने हैं
हमने डरना छोड़ दिया है.

*– शैलेन्द्र चौहान*

# ‘ठाणे क्लस्टर विकास कंपनी’च्या प्रस्तावावर सवाल

किसन नगर परिसरातील क्लस्टर-प्रकल्पाच्या कामकाजाच्या पार्श्वभूमीवर ‘ठामपा’च्या नियंत्रणाखाली ‘ठाणे क्लस्टर विकास कंपनी’ स्थापन करून त्यासाठी महासभेची मंजुरी घेण्याच्या घाईमागे नेमके कोणाचे हित आहे?, असा सवाल धर्मराज्य पक्षाने उपस्थित केला.

ठाणे शहरात पाणी, वीज, मलनि:स्सारण, अग्निसुरक्षा, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, सार्वजनिक वाहतूक व पार्किंग यांसारख्या मूलभूत सुविधांची कमतरता असताना, वाढत्या बांधकामामुळे शहरावर आणखी भार टाकण्यापूर्वी या कंपनीच्या माध्यमातून एकूण किती चटईक्षेत्राचे क्लस्टर प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत, त्यासाठी किती चटई निर्देशांक देण्यात येणार आहे आणि एवढा चटई निर्देशांक शहराच्या सध्याच्या पायाभूत सुविधांना झेपणारा आहे का, याचा संपूर्ण व पारदर्शक खुलासा करावा, अशी मागणी करण्यात आली.

‘‘महापालिका कोणाची? जनतेची की कंपन्यांची? क्लस्टरच्या नावाखाली कंपनी कोणासाठी? ठाणेकरांसाठी




की बिल्डरांसाठी?’’ असा सवाल करत, कोणत्याही मोठ्या विकास प्रकल्पापूर्वी शहराची वहनक्षमता, पायाभूत सुविधांची क्षमता आणि भविष्यातील परिणामांचा शास्त्रशुद्ध अभ्यास सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान ठाणे महानगरपालिका आयुक्त मा. सौरभ राव यांना धर्मराज्य पक्षाच्या वतीने मागण्यांचे निवेदन सादर करून तातडीने कार्यवाहीची मागणी करण्यात आली. प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास ठाणेकर नागरिकांच्या हितासाठी यापुढेही अधिक तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा धर्मराज्य पक्षाने दिला.

यावेळी धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष मा. राजन राजे यांच्यासह, काँग्रेस पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष राहुल पिंगळे, सचिव महेंद्र म्हात्रे, संभाजी ब्रिगेडचे श्री. चंद्रशेखर पवार, जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयचे श्री. संजय मं.गो., ठाणे मतदाता जागरण अभियानचे उन्मेष बागवे व राजेंद्र चव्हाण (भारत जोडो अभियान), आम आदमी पक्षाचे ठाण्यातील पदाधिकारी, तसेच धर्मराज्य पक्षाचे सचिव नरेंद्र पंडित, प्रवक्ता समीर चव्हाण, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष सचिन शेट्टी, धर्मराज्य कामगार कर्मचारी महासंघाचे खजिनदार अजित सावंत, जगन्नाथ सलगर, हनुमंत किणी, शरद भोईर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ठाणे रिक्षा संघटनेचे सुशीलकुमार चंद्रा, रवी मिश्रा, महासंघाचे कामगार सदस्य तुषार बर्डे व अन्य कामगार सदस्य आणि ठाणेकर नागरिक सहभागी झाले होते.

## भर पावसात तिरंगा रॅली

...पृष्ठ क्र. १ वरून

पावसात भिजत, हातात तिरंगा घेऊन आणि ‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम्’च्या जयघोषात निघालेल्या या रॅलीने परिसरात राष्ट्रभक्तीचे उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले.

या विशेष सोहळ्यास ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची विशेष पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी खासदार श्री. राजन विचारे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या स्वातंत्र्यदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ठाणे जिल्हाप्रमुख श्री. केदार दिघे, श्री. नरेश मणेरा, ज्येष्ठ पत्रकार श्री. हेमंत देसाई, तसेच अनेक माजी सैनिक उपस्थित होते. ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने प्रवक्ता श्री. समीर चव्हाण, लोकसभा उपाध्यक्ष व ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, पक्षाचे सचिव श्री. नरेंद्र पंडित आणि श्री. अनिल महाडिक यांचीही उपस्थिती होती.

याप्रसंगी देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या माजी सैनिकांचा तसेच वीरपत्नींचा मा. राजन राजे आणि श्री. केदार दिघे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

पावसाची पर्वा न करता स्वातंत्र्यदिनाचा उत्सव साजरा करण्यासाठी एकवटलेला शिवसैनिकांचा उत्साह, तिरंग्याप्रती असलेला अभिमान आणि देशभक्तीची भावना या संपूर्ण सोहळ्यात प्रकर्षाने जाणवत होती.

या दिमाखदार स्वातंत्र्यदिन सोहळ्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शेकडो शिवसैनिक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## करवाढीविरोधात शांततामय आंदोलन

यावेळी सन २०२४-२५ व २०२५-२६चे लेखापरीक्षण अहवाल तातडीने जाहीर करून अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करावेत, तसेच महसूल थकबाकीची अद्ययावत, अधिकृत व विभागनिहाय आकडेवारी जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. ‘‘थकबाकी वसूल करण्याची हिंमत दाखवा; करवाढीचा सोपा मार्ग सोडा!’’ असा इशाराही देण्यात आला.

ठाणे शहरातील वाढती वाहनसंख्या आणि अपुऱ्या पार्किंग सुविधांमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता, विकास आराखड्यातील



वाहनतळासाठी आरक्षित/निर्धारित सुविधा भूखंडांवर बहुमजली व नियोजनबद्ध वाहनतळ उभारावेत आणि रस्त्यावरील धोकादायक पार्किंगला प्रोत्साहन देणारा ठराव रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली.

## संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

यावेळी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

स्वातंत्र्यलढ्यातील बलिदानातून मिळालेले स्वातंत्र्य आणि त्यानंतर भारतीय जनतेने स्वत:ला अर्पण केलेले भारतीय संविधान हेच आपल्या लोकशाहीचे खरे अधिष्ठान आहे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाची मूल्ये अबाधित ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्यानंतर कोर्ट नाका येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीशिल्पाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## कामगारांच्या लढ्याला कामगार ऐक्याची भक्कम साथ

मे. अंशुल इनोव्हेटिव्ह केमिस्ट्री प्रा. लि. येथील कामगार गेल्या तीन महिन्यांपासून आपल्या न्याय्य व प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संपावर आहेत. आपल्या हक्कांसाठी सुरू असलेल्या या संघर्षाला आता विविध उद्योगांतील कष्टकरी कामगारांकडूनही भक्कम पाठिंबा मिळत आहे. धर्मराज्य पक्ष प्रणित धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाशी संलग्न रायगड, तळोजा येथील जॉन्सन मॅथे कंपनीतील कामगार सदस्यांनी अंशुल इनोव्हेटिव्ह केमिस्ट्रीच्या संपकरी कामगारांची भेट घेऊन त्यांच्या संघर्षाप्रती एकजूट व्यक्त केली. यावेळी संपकरी कामगारांना रु. २२,५००/- चा धनादेश प्रदान करून आर्थिक मदतीचा हात पुढे करण्यात आला.

विशेष म्हणजे, जॉन्सन मॅथे कंपनीतील कामगारांनीदेखील चार वर्षांपूर्वी आपल्या न्याय्य व प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारला होता. या संघर्षानंतर व्यवस्थापनासोबत झालेल्या चर्चेतून एक त्रैवार्षिक वेतन करारदेखील संपन्न झाला. त्यामुळे अंशुल इनोव्हेटिव्ह केमिस्ट्रीच्या कामगारांच्या सध्याच्या संघर्षातील वेदना आणि त्यांची लढ्याची गरज जॉन्सन मॅथेतील कामगारांनीही जवळून अनुभवलेली आहे.

ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नसून, ‘‘एक उद्योगातील कामगारांच्या न्याय्य लढ्याच्या पाठीशी दुसऱ्या उद्योगातील कामगार ठामपणे उभे आहेत,’’ या संघटित कामगार चळवळीच्या ऐक्याची आणि बंधुभावाची जिवंत प्रचिती आहे.

कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेल्या या संघर्षाला धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचा ठाम आणि सक्रिय पाठिंबा आहे. कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घेऊन चर्चेच्या माध्यमातून लवकरात लवकर समाधानकारक तोडगा काढावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

या आर्थिक मदतीमुळे संपकरी कामगारांना आपला संघर्ष पुढे नेण्यासाठी निश्चितच बळ मिळाले आहे. विविध उद्योगांतील कामगारांनी एकमेकांच्या न्याय्य लढ्याच्या पाठीशी उभे राहणे, हेच संघटित कामगार शक्तीचे खरे सामर्थ्य आहे.

कामगार एकजुटीचा विजय असो!

# अंधश्रद्धेच्या अंधाराकडून विवेकाच्या प्रकाशाकडे

## महा. अंनिसच्या ३७व्या वर्धापनदिनी सामाजिक परिवर्तनाचा निर्धार



**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ३७व्या वर्धापन दिनानिमित्त महा. अंनिस – ठाणे शहर शाखेच्या वतीने रविवार, दि. ०९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित विशेष कार्यक्रमास धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष मा. राजन राजे तसेच ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.**

या कार्यक्रमात १५व्या विद्रोही साहित्य-संस्कृती संमेलनाचे सातारा येथील नवनिर्वाचित अध्यक्ष व लोकशाहीर साथी संभाजी भगत यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकनिष्ठ विचार आणि सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक चळवळीच्या संदर्भात मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यावेळी साहित्य, कला, लोकशाही आणि सामाजिक परिवर्तन यांचा परस्परांशी असलेला संबंध यावरही विचारमंथन झाले.

**मा. राजन राजे यांच्या भाषणातील महत्त्वपूर्ण विचार –**

**''ज्ञान-विद्वत्ता, व्यासंग आणि अनुभवसिद्धता...याचा अर्थाअर्थी 'आकलनशक्ति'शी थेट सबंध असतोच असं नाही! आकलन, ही काव्यप्रतिभेसारखी किंवा अन्य तऱ्हेच्या प्रतिभेच्या आविष्कारासारखी जन्मसिद्ध असते का...ते तुमच्या DNA मध्येच वसलेलं असतं का; नक्की समीकरण मांडणं, तसं कठीण आहे... पण, 'आकलन' म्हणजे, एरव्ही आपण समजतो तसं इंग्रजीत Assessment नव्हे; तर, Comprehension होय. जगण्याच्या प्रश्नांची यशस्वीरित्या सोडवणूक करण्यासाठी लागणारा अत्यावश्यक घटक! समज, समजूतदारपणा, व्यवहारज्ञान, परिस्थितीचं भान आणि ज्ञान...हे त्याच्या जवळपास जाणारे अर्थ. समस्यांचं मुळातून आकलन झाल्याखेरीज त्यातून सुटकेचा मार्ग कसा समजणार?**

कार्ल मार्क्स, म. गांधी हे राजकारण-समाजकारणाच्या दृष्टीकोनातून...गौतम बुद्धांपासून सुरुवात केली की, आपली संत ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, जनाबाई, तुकाराम, तुकडोजीमहाराज, गाडगेबाबा ही सगळी आध्यात्मिक अंगाने आणि शिवछत्रपती महाराज, पं. नेहरु, डॉ . बाबासाहेब आंबेडकर हे राजकीय व प्रशासकीय अशा दोन्ही दृष्टीकोनातून अत्युच्च दर्जाचं 'आकलन' असलेली, सर्वसाधारणपणे आपल्याला माहीत असलेली मंडळी!

बाबासाहेबांनी काळाची पावलं अचूक ओळखून आपल्या जमातीला ''शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा'', असा अमोघ संदेश दिला!

**स्वातंत्र्य-चळवळ उभारताना....बहुजनांना, महिलांना, वंचित वर्गाला समाविष्ट करुन घेतलं आणि जशी आजच्या -जेन-झी'ने जुलमी सत्ताधाऱ्यांबाबतची जनतेच्या मनातील भिती नष्ट केली; हे त्यांच्या उत्तुंग आकलनाचेच दर्शन होय.**

कार्ल मार्क्स, अतिशय महत्त्वपूर्ण प्रतिपादन करुन गेला, ''The philosophers have only interpreted the world, in various ways; the point is to change it.'' तेव्हा, मला कधि कधि वाटतं की, लंडनच्या हायगेट स्मशानभूमीत असंच अवचित कधि उठून कार्ल मार्क्सने, आमच्या पोरसवदा वयाच्या 'संभाजी भगत'च्या डोक्यावर हात ठेवला असेल आणि त्यातूनच, 'शाहीर संभाजी भगत' घडला असणार...कारण, हाच ''जग बदलण्याचा'' विचार तहहयात त्यांचा पिच्छा पुरवतोय!

पण, **कार्ल मार्क्स फक्त, जाणिवेच्या पातळीवर काम करत होता; तर, गौतम बुद्ध, म. गांधी जाणिवा आणि नेणिवा अशा दोन्ही पातळ्यांवर काम करु पहात होते आणि तोच मार्ग शाहीर संभाजी भगतांनी अनुसरलेला दिसतो. सांस्कृतिक-कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजाच्या 'जाणिवा आणि नेणिवा' विकसित केल्याखेरीज कल्याणकारी 'शाश्वत-परिवर्तन' होणार नाही; ही त्यांची ठाम असलेली धारणा, अगदी योग्यच होय!**

माझी तशी त्यांच्याशी ओळख अलिकडचीच...साधारण वर्षभरापूर्वी निवर्तलेले, कामगार-चळवळीचे आधारस्तंभ, कॉ. संजय संघवींचे, यांचे ते जिगरी दोस्त...हे ही आम्हाला अलीकडेच समजलेलं! बायबलमध्ये म्हटलंय... ''By their fruit you will recognize them...Do people pick grapes from thorn bushes, or figs from thistles?'' अगदी तसंच, ''त्यांच्या कृती आणि त्यांच्या अस्तित्वाचे भवतीच्या समाजावर झालेले परिणाम'' पाहिल्यानंतर...अगदी थोडक्या परिचयात, मी त्यांच्या एकूण व्यक्तित्वाचा धांडोळा घेऊ शकलो, ते माझ्यासाठी, एकूणच समाजासाठी व कामगार-चळवळीसाठी खूपच महत्त्वाचं आहे.

**शाहीर संभाजी भगतांच्या हातून समाजात कल्याणकारी परिवर्तन होवो आणि त्याकामी आमचं 'योगदान' खर्ची पडो...हीच, साताऱ्याच्या 'विद्रोही साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदी' निवड झाल्याबद्दलच्या सत्कार-समारंभाप्रसंगी आमची मनोकामना, धन्यवाद... ।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।''**

अंधश्रद्धेच्या अंधारातून विवेकाच्या प्रकाशाकडे, अज्ञानातून विज्ञानाकडे आणि अन्यायातून समता-न्यायाच्या दिशेने समाजाला घेऊन जाण्याचा हा लढा अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.




# २० ऑगस्ट - विश्व धम्मलिपी गौरव दिवस

जेम्स प्रिन्सेप १८१९ मध्ये जेव्हा भारतात आला तेव्हा तो २० वर्षांचा होता. जेम्स हा जॉन व सोफिया यांचं १० वं अपत्य होता. १७७१ मध्ये जेम्सचे वडील, जॉन यांनी भारतात येऊन अमाप पैसा कमावला होता व भारतातील संधी पाहून आपल्या मुलांनाही भारतात पाठवले. जेम्सला इंजिनिअरिंग व आर्किटेक्ट या विषयांत खूप आवड होती. **वडिलांच्या ओळखीने जेम्सला भारतात, कलकत्ता येथील टांकसाळीत 'अस्से मास्टर' म्हणजे 'पारख करणारा' म्हणून काम मिळाले. वर्षभरातच त्याची वाराणसीच्या टांकसाळीत बदली करण्यात आली. त्याची कामाची प्रगती बघून थोड्याच अवधीत त्याला बढतीवर पुन्हा कलकत्त्याला बोलविण्यात आले. टांकसाळीत अस्से मास्टर म्हणून काम करताना त्याला अनेक नवीन प्रयोग करता आले व त्याने नवीन उपकरणांचा शोध घेतला. टांकसाळीतील प्रचंड मोठ्या भट्टीतील अचूक तापमान मोजण्याचे उपकरण किंवा ०.१९ ग्रॅम एवढ्याशा धातूचे वजन करण्याचा तराजू ही त्यापैकी काही उपकरणे जेम्सने तयार केली.** वाराणसीमध्ये असताना, जेम्स तेथील अनेक इमारतींच्या शिल्पकलेने भारावून गेला. वाराणसीच्या टांकसाळीचे डिझाईन, तेथील चर्च, वाराणसीला रोगराईपासून बचाव करण्यासाठी सांडपाणी वाहून नेणारी भूमिगत भुयारे, औरंगजेबच्या मिनारांची दुरुस्ती आणि दगडी पूल हे सर्व जेम्सच्या कल्पकतेची आजही साक्ष देतात.

कलकत्त्याला आल्यानंतर जेम्सने नाणे संशोधनावर भर दिला. जेम्सला ''जर्नल ऑफ एशियाटिक सोसायटी''चे संपादक करण्यात आले आणि त्यात त्याने रसायनशास्त्र, खनिज, नाणेशास्त्र, भारतातील प्राचीन वास्तू, स्थळे, हवामान बदल व पर्यावरणावर अनेक लेख प्रसिद्ध केले. मात्र जेम्स प्रिन्सेपची खरी ओळख जगाला झाली ती त्याच्या लिपी संशोधनामुळे. **जेम्स तसा खऱ्या अर्थाने भाषातज्ज्ञ किंवा लिपितज्ज्ञ नव्हता, मात्र त्याला संशोधनाची आवड होती. प्रत्येक गोष्टीची सखोल माहिती तो मिळवायचा. प्राचीन नाण्यांवर काम करीत असताना त्यातील अक्षरे त्याला खुणवू लागली. त्या अक्षरांचे संशोधन तोपर्यंत सीमित होते. या अक्षरांमध्ये व अलाहाबादच्या स्तंभावरील अक्षरांमध्ये काहीतरी साम्य आहे असे वाटल्याने जेम्सने त्याचा पाठपुरावा करायचे ठरविले.** ओरिसामधील काही खडकांवर देखील काही अक्षरे कोरलेली असल्याचे त्याला कळाले. बिहारमधील बेतिहा या ठिकाणचे काही शिलालेखांचे ठसे त्याने मागविले. त्याने भारतातील अनेक संस्कृत पंडितांना याबद्दल विचारले, मात्र कोणालाही ते सांगता आले नाही. बॅक्टेरिया आणि कुषाण यांच्या इंडो-ग्रीक नाण्यांच्या अभ्यासातून त्याने 'खरोष्ठी' या प्राचीन लिपीचा शोध लावला. त्याचा हा निबंध एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आणि संपूर्ण भारतातून लोकांनी त्याच्याकडे अनेक शिलालेखांचे ठसे, नाणी, हस्तलिखिते पाठवून दिली. एवढेच नव्हे तर महाराजा रणजीत सिंह यांचे फ्रेंच जनरल जीन बाप्तीस्ते व्हेंतुरा यांनी रावलपिंडीमधील उत्खननात सापडलेले काही शिलालेख पाठवून दिले.

या शिलालेखांच्या अभ्यासातून प्रिन्सेप यांनी सर्वात प्रथम शोध लावला तो ''दानं'' या शब्दाचा, कारण अनेक शिलालेखांच्या शेवटी हा शब्द लिहिला होता. **१८३७ मध्ये प्रथमच भारतातील शिलालेखांमधील अक्षरांचा शोध प्रिन्सेपने लावला. पुढे सम्राट अशोकाचे शिलालेख वाचताना त्यांच्यात प्रत्येक वेळी आलेला ''देवानांपिय पियदस्सिन'' हे कोणाला उद्देशून आहे, हे कळत नव्हते. प्रिन्सेपला वाटले की, हा कोणी श्रीलंकेचा राजा असावा; कारण ''महावंस''मधून तेथील देवानांपिय राजाचे नाव मिळत होते. मात्र श्रीलंकेच्या राजाचे हे शिलालेख किंवा स्तंभलेख भारतात कसे काय, हा प्रश्न त्याला पडला. सतत ६ आठवड्यांच्या अथक प्रयत्नांनंतर, अनेक शिलालेख वाचल्यानंतर व त्यांचे मित्र जॉर्ज टर्नर यांनी श्रीलंकेतील पाली भाषेतील पाठविलेल्या काही संदर्भग्रंथांवरून देवानांपिय पियदस्सिन म्हणजेच सम्राट अशोक असल्याचे प्रतिपादन प्रिन्सेपने केले.** या सर्व शिलालेखांमध्ये सम्राट अशोकांचा न्याय, नीती व लोककल्याणाचा मार्ग हे समान सूत्र लिहिले आहे.




या शोधानंतर प्रथमच जगाला अशोक नावाच्या सम्राटाचा शोध लागला. अनेक शिलालेखांच्या अभ्यासातून प्रिन्सेपने सम्राट अशोकांचे सारे आयुष्य जगासमोर ठेवले. जवळपास २२०० वर्षे अशोक नावाचा कोणी सम्राट या देशात होऊन गेला याचे कोणाला गावीही नव्हते. १९१५ मध्ये कर्नाटकातील मस्की येथील शिलालेखात सम्राट अशोकांचे नाव दिसले आणि प्रिन्सेपच्या अचूक अभ्यासाची कल्पना आली.

या शोधानंतर प्रथमच जगाला अशोक नावाच्या सम्राटाचा शोध लागला. अनेक शिलालेखांच्या अभ्यासातून प्रिन्सेपने सम्राट अशोकांचे सारे आयुष्य जगासमोर ठेवले. जवळपास २२०० वर्षे अशोक नावाचा कोणी सम्राट या देशात होऊन गेला याचे कोणाला गावीही नव्हते. १९१५ मध्ये कर्नाटकातील मस्की येथील शिलालेखात सम्राट अशोकांचे नाव दिसले आणि प्रिन्सेपच्या अचूक अभ्यासाची कल्पना आली.

**या सर्व शिलालेखांचे आणि प्रिन्सेपच्या कार्याचा गौरव साऱ्या जगाने केला. पुढे प्रिन्सेपने भारतातील शिलालेखांच्या संशोधनाला वाहिलेल्या 'Corpus Inscriptionum Indicarum'' या नावाची ग्रंथाची मालिका प्रकाशित करण्याचा सुतोवाच केला, जो ग्रंथ पुढे जाऊन सर अलेक्झांडर कनिंगहॅमने १८७७ ला प्रकाशित केला. जेम्स प्रिन्सेपच्या लिपी शोधामुळे भारतातील अँटिओकोस आणि ग्रीक राजांच्या बरोबरच भारतातील अनेक राजांचा इतिहास कळाला.** प्रिन्सेपने अफगाणिस्तानमधील शिलालेखांचादेखील अभ्यास केला. शिलालेखांच्या अभ्यासावरून प्रिन्सेपने सम्राट अशोकांच्या प्रचंड राज्याची माहिती लोकांसमोर आणली. प्रिन्सेपने शिलालेखांच्या अभ्यासाचा धडाकाच लावला. दररोज १८ ते २० तास त्याचे संशोधन चाले.

अतिपरिश्रमामुळे प्रिन्सेपला प्रचंड डोकेदुखीचा त्रास होऊ लागला. हवाबदल व उपचारासाठी त्याला इंग्लंडला हलविण्यात आले, मात्र २२ एप्रिल १८४० साली उण्यापुऱ्या ४१ व्या वर्षी प्रिन्सेपचे निधन झाले.

**भारतीय शिलालेखातील सर्वात प्राचीन असलेली धम्मलिपी व खरोष्ठी लिपी यांचा शोध आणि त्यातून सम्राट अशोक व त्यांचे कार्य जगासमोर येऊ शकले ते केवळ जेम्स प्रिन्सेपमुळेच! भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण अर्थात A.S.I. ची स्थापना करण्याचे बीज प्रिन्सेपने रोवले होते. प्रिन्सेपने दिलेल्या योगदानाची दखल घेऊन कोलकाता नगरीच्या सुजाण नागरिकांनी त्याच्या स्मरणार्थ हुगळी नदीकाठी ''प्रिन्सेप घाट'' बांधला, तर इंग्लंडमध्ये सरकारच्या वतीने त्याच्या नावाचे मेडल बनविले.** जॉन रोयाले नावाच्या जीवशास्त्रज्ञाने एका झाडाच्या प्रजातीचे नाव ''प्रीन्सेपिया'' ठेवले. एशियाटिक सोसायटीने त्याचा अर्धपुतळा बसविला. १७७१ मध्ये पहिल्यांदा आलेल्या जॉन प्रिन्सेपनंतर प्रिन्सेप घराण्याच्या चार पिढ्यांनी भारतात वास्तव्य केले. नुकतेच जेम्स प्रिन्सेपच्या चौथ्या पिढीतील मुलाने जेम्स प्रिन्सेपचे जपून ठेवलेले सारे हस्तलिखितांचे पेटारे अभ्यासासाठी भारत सरकारच्या हवाली केले.

भारतातील सर्वात प्राचीन असलेल्या सम्राट अशोकांच्या ''धम्मलिपी''चा शोध व भारतीय शिलालेखांचे गूढ उकलल्याबद्दल जेम्स प्रिन्सेपला आदरपूर्वक नमन!

***...अतुल मुरलीधर भोसेकर***

# 'पीडित मानसिकते'चं राजकारण

जानेवारी २०२१. दिल्लीतल्या जवाहर भवनमधल्या एका शैक्षणिक कार्यक्रमाची ही गोष्ट. प्रियांका गांधी प्रमुख पाहुण्या म्हणून आल्या होत्या. तिथली सगळी मंडळी एकदम तरुण, नवमतदार होती. काही जण पहिल्यांदाच मतदान करणार होते, तर काहींनी नुकतंच पहिलं मतदान केलं होतं. त्यामुळे प्रियांका गांधी तिथे काहीतरी राजकीय विषयांवरही बोलतील, असं साहजिकच वाटत होतं.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपने गांधी कुटुंबाविरुद्ध वर्षानुवर्षे केलेल्या प्रचाराबद्दल त्या बोलतील, असं वाटत होतं. गेली अनेक वर्षं राहुल, सोनिया, राजीव गांधी, स्वतः प्रियांका आणि अगदी त्यांचे पती यांचा असभ्य टीका, वैयक्तिक आरोप आणि अपप्रचार यातून मानसिक छळ करणं सुरू राहिलं. त्यावर त्यांना तिथे बोलण्याचा पूर्ण अधिकारच होता.**

पण प्रियांका यांचं अगदी निराळंच आणि अर्थपूर्ण भाषण ऐकायला मिळालं. एक सुखद धक्का बसला. त्या कार्यक्रमातल्या साधारण वीस मिनिटांच्या भाषणात प्रियांका गांधींनी कुठल्याही राजकीय मुद्द्याला स्पर्श करणारा एकही शब्द काढला नाही. तिथले श्रोते महाविद्यालयीन आणि विद्यापीठातले तरुण विद्यार्थी असल्यामुळे, त्यांनी स्वतःचा एक अतिशय खासगी पण अर्थगर्भ अनुभव सर्वांसमोर मांडला.

प्रियांका गांधी म्हणाल्या की, एके दिवशी सकाळी त्या घरात असताना त्यांना त्यांच्या मुलाच्या, रेहानच्या मित्राचा फोन आला. त्याने सांगितलं की, क्रिकेट खेळताना रेहानच्या डोळ्याला दुखापत झाली आहे. खरं तर ही दुखापत दोन दिवसांपूर्वीच झाली होती. पण दोन दिवस उलटून गेल्यामुळे रेहानच्या जखमी डोळ्याची दृष्टी पूर्णपणे गेली होती. प्रियांका धावतपळत रुग्णालयात पोहोचल्या. डॉक्टरांनी सांगितलं की, उपचाराला उशीर झाल्यामुळे एका डोळ्याचं कायमचं नुकसान झालं आहे.



त्या पुढे म्हणाल्या, ''बऱ्याच लोकांनी आम्हाला शाळेवर निष्काळजीपणाची केस ठोकण्याचा सल्ला दिला. कारण एखादं मूल जखमी होऊनही जर शाळेने दोन दिवस काहीच केलं नसेल, तर तो नक्कीच शाळा प्रशासनाचा गाफीलपणा होता. पालक जेव्हा आपल्या मुलाला शाळेत पाठवतात, तेव्हा ते संपूर्णपणे शाळेवरच विश्वास ठेवत असतात. पण आम्ही शाळेवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याचा निर्णय घेतला.''

''का?''

त्या म्हणाल्या, **''कारण, आमच्या मुलाने आयुष्यभर स्वतःला पीडित (व्हिक्टिम) समजत राहावं, असं आम्हाला अजिबात वाटत नव्हतं. आणि त्यानंतरही आम्ही त्याला कधीच असं म्हटलं नाही की, तुझ्यासोबत जे काही घडलं, ते फक्त शाळेच्या निष्काळजीपणामुळेच झालं.''**

गांधी-वाड्रा कुटुंबाने नेमका असा निर्णय का घेतला असेल, हा प्रश्न मला कित्येक दिवस पडला होता.

**अशीच या विषयाशी जोडलेली आणखी एक जुनी घटना.**

रश्मी त्रिपाठी यांनी एकदा त्यांच्या मुलीबद्दल हे सांगितलं होतं. त्यांच्या मुलीला फक्त काही मार्कांमुळे एम्समध्ये (AIIMS) ॲडमिशन मिळाली नाही. तिच्यापेक्षा कमी गुण असूनही आरक्षित प्रवर्गातील काही विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला होता. पण तरीही या गोष्टीमुळे त्यांनी आपल्या मुलीला कधीही पीडित मानसिकतेकडे जाऊ दिलं नाही.

त्या म्हणाल्या होत्या की, त्यांनी आपल्या मुलांवर नेहमी एकच गोष्ट बिंबवली, शतकानुशतके दडपशाही सहन केलेल्या समाजातील लोकांनी अचानक येऊन सर्वांसोबत समान पातळीवर स्पर्धा करावी, अशी अपेक्षा करणे योग्य नाही. लहानपणापासून कैदेत जखडून ठेवलेल्या मुलाने थेट निष्णात धावपटूशी स्पर्धा करून जिंकावे, अशी अपेक्षा करणे अन्यायी, अमानुष आहे तसेच हे.

दोन दिवसांपूर्वीचा पंतप्रधान मोदींचा व्हिडिओ आणि त्याआधीही त्यांचं वारंवार ''माझ्यावर अत्याचार झाले, माझ्या आईवर अत्याचार झाले'' असं म्हणणं ऐकल्यावर मला प्रियांका गांधींनी सांगितलेला तो प्रसंग आठवला. आणि पीडित मानसिकतेचं (व्हिक्टिम मेंटॅलिटीचं) मानसशास्त्र मला थोडं जास्त स्पष्टपणे समजलं.

सतत स्वतःबद्दल वाईट वाटून घेण्याचे काही छुपे फायदे असतात; जसं की लोकांची सहानुभूती कायम तुमच्या बाजूने झुकलेली राहते. पण पीडित मानसिकता म्हणजे आपल्या अपयशांसाठी, चुकांसाठी किंवा उणिवांसाठी कायम इतरांना दोष देण्याची प्रवृत्ती. अशा वेळी तो माणूस स्वतःच्या आयुष्याची जबाबदारी कधीही स्वीकारत नाही, सतत परिस्थितीला किंवा इतर व्यक्तींना जबाबदार ठरवून मोकळा होतो.

**पंतप्रधान मोदी अनेकदा त्यांच्या बालपणीच्या गरिबीच्या बऱ्याच गोष्टी खूप रंगवून सांगतात.**

खरं तर, आपले त्यांच्याआधीचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हेसुद्धा अत्यंत वंचित आणि कठीण परिस्थितीतूनच आले होते. पण त्यांनी स्वतःला कधीही 'पीडित' म्हणून लोकांसमोर सादर केलं नाही, की कधी रडगाणं गायलं नाही. विशेष म्हणजे, मोदींच्या गरिबीच्या असंख्य गोष्टी ऐकूनही, डॉ. मनमोहन सिंग यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीबद्दल जाणून घ्यावं, असं मला कधी वाटलंच नाही. कारण मनमोहन सिंगांनी स्वतःची ओळख कधीही गरिबीच्या आधारावर, पीडित असण्याच्या भांडवलावर निर्माण केली नव्हती.



खरे पाहता, पीडितपणा ही काही मानसिक विकृती नाही. पण अनेक लोकांमध्ये ती बचावाची सोयीस्कर वाटणारी प्रवृत्ती म्हणून दिसते. एक पॅटर्न असतो त्यांच्यात. या पॅटर्नप्रमाणे वागणाऱ्या व्यक्ती स्वतःच्या कुठल्याही कृतींची आणि निर्णयांची जबाबदारी घेणे टाळतात आणि त्यासाठी कायम दुसऱ्या व्यक्तीला किंवा परिस्थितीला दोष देतात. अवचित मिळालेले श्रेय घेण्यास मात्र वखवखलेल्या असतात.

**मोदींना मानसशास्त्रीयदृष्ट्या समजून घेताना हीच खरी मेख आहे, हे जाणवते. मोदी या पीडित प्रवृत्तीचे बळी नाहीत. उलट, ते पीडित मानसिकतेचा अत्यंत कौशल्याने आणि धूर्तपणे वापर करतात.**

**स्वतःच्या अपयशांसाठी कायम इतरांना दोष देणे, सतत पीडित असल्याचे दाखवत आक्रोश करणे आणि स्वतःला वंचित, छळ होत असलेला म्हणून उभे करणे यामुळे त्यांच्या अंधभक्त अनुयायांनाही विरोधकांवर त्या व्हिक्टिमहुडचा ढालीसारखा उपयोग करत हल्ला करण्याची संधी मिळते आणि चर्चेतला मूळ मुद्दा दाबून टाकण्याची त्यांची रणनीती अधिक प्रभावी ठरते.**

मात्र, यावेळी उलट प्रकार घडला आहे. या वेळी, या पीडित दिसण्याच्या नेहमीच्या खेळात खुद्द महामहिम मोदीच सार्वजनिक थट्टेचा विषय बनल्याचे दिसत आहे.

*- अमिता नीरव*

स्वातंत्र्यदिन विशेष

# ।। शैक्षणिक गुंतवणुकीतून खरे स्वातंत्र्य !।।

आज १५ ऑगस्ट, एकविसाव्या शतकाची पंचवीशी ओलांडणारा हा पहिलाच स्वातंत्र्यदिन! जंतरमंतर येथील यशस्वी शैक्षणिक लढ्याने सामान्य जनतेला स्वातंत्र्याचा अर्थ कळू लागला. अंमळ उशिराने आलेली ही जागृती शिक्षणक्षेत्रात सरकारी गुंतवणूक करण्याच्या दिशेने जायला हवी.

**भारतीय समाजाला ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' असा प्रेरणादायी संदेश बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. त्याप्रमाणे स्वतंत्र भारतातील जनता अर्धपोटी राहून मोडक्या-तोडक्या शाळांत शिकू लागली, शिक्षणामुळे मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करून मागे राहिलेल्या बहिण-भावांना चेतवू लागली व वेळप्रसंगी संघटितही करू लागली. यांमुळे जुन्या मूल्यव्यवस्थेला मोठा फटका बसला. ज्या मूल्यव्यवस्थेने ओबीसी, शेतकरी, भटके-विमुक्त, मराठा, अनुसूचित जाती-जमाती व स्त्रियांना अवमानित केले होते, त्याच मूल्यव्यवस्थेला आव्हान देणारे प्राध्यापक, डॉक्टर्स, इंजिनियर्स, विचारवंत, साहित्यिक, प्रशासक, वकील, उद्योजक, न्यायाधीश शिक्षणामुळे निर्माण होऊ लागले. म्हणून तारीख १ फेब्रुवारी २०२६ रोजी लोकसभेत जाहीर केलेल्या देशाच्या अर्थसंकल्पात शिक्षणासाठी केलेली तरतूद आपल्या महामानवांच्या स्वप्नातील भारत उभारण्यास सहाय्यभूत होऊ शकते का, याची चिकित्सा करायला हवी.**

यावर्षी सादर केलेल्या अर्थसंकल्पात, केंद्र सरकार एकूण ५३,३४,३१५ कोटी खर्च करणार आहे. (अक्षरी रुपये त्रेपन्न लाख, चौतीस हजार, तीनशे पंधरा कोटी फक्त!) त्यापैकी शालेय शिक्षणासाठी ८३,५६२ कोटी (अक्षरी रुपये त्र्याऐंशी हजार, पाचशे बासष्ट कोटी फक्त), तर उच्च शिक्षणासाठी ५५,७२७ कोटी (अक्षरी रुपये पंचावन्न हजार, सातशे सत्तावीस कोटी फक्त) एवढा खर्च करणार आहे. अशा तऱ्हेने शिक्षणावर एकूण १,३९,२८९ कोटी (अक्षरी रुपये एक लाख, एकोणचाळीस हजार, दोनशे एकोणनव्वद कोटी फक्त) खर्च होणार आहेत. म्हणजे शासन एकूण अर्थसंकल्पाच्या इनमिन २.६०% निधी हा शिक्षणावर खर्च करणार आहे. देशाच्या शैक्षणिक गरजा विचारात घेता, हा निधी पुरेसा आहे काय?

आणखी वीस वर्षांनी भारताला स्वातंत्र्य मिळून १०० वर्षे होतील. तरीही जगातील पहिल्या दोनशे विद्यापीठांत गणले जाईल असे एकही विद्यापीठ आज भारतात नाही. 'असर २०२२ - ग्रामीण' अहवालानुसार, १४ ते १८ या वयोगटातील २५% मुलीं-मुलांना मातृभाषेतील दुसरीच्या पुस्तकातील धडा अस्खलितपणे वाचता येत नाही. याच वयोगटातील ५०% हून अधिक मुलीं-मुलांना तीन अंकी संख्येला एक अंकी संख्येने भागण्याचे गणित सोडविता येत नाही. अशी ही भारताची भावी पिढी देशापुढील जटिल समस्या कशा सोडविणार आहे? या पिढीला स्वतःच्या आयुष्याच्या समस्या तरी सोडवता येतील का? शैक्षणिक अपयशाने स्वतःवरील विश्वास गमावून बसलेली ही पिढी मानसिक पंगू होऊन सहजगत्या व्रतवैकल्ये-नवसयात्रा-बुवा-अम्मा-कावडतीर्थ या निष्फळ कर्मकांडांत गुरफटून अंधश्रद्धाळू होईल व जातीय-धार्मिक दंगलींत कच्चा माल म्हणून तिचा निर्दयी बळी दिला जाईल. शिवाय गरिबीमुळे शाळेचे तोंडही न पाहिलेल्या किंवा अर्धवट शाळा सोडून गेलेल्या मुली-मुलांची संख्या देखील प्रचंड आहे. शाळेत येण्या-जाण्यासाठी सोयीस्कर वाहतूक व्यवस्था नाही. शाळांमध्ये शौचालयाची सोय नाही. मोडके फळे व गळके छप्पर हे सामान्य दृश्य आहे. मध्यान्ह भोजनाच्या नावाने खुलेआम जातिभेद चालतो. इनमिन २.६०% निधी शिक्षणासाठी देऊन देशाचे धोरणकर्ते या समस्यांची सोडवणूक कशी करणार आहेत ?

जागतिक स्तरावर ''ओईसीडी'' म्हणजे 'ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट' नावाचा फ्रान्स, जर्मनी, युके, स्वीडन, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया, बेल्जियम, स्पेन, कॅनडा, हंगेरी, पोर्तुगाल आदि ३७ देशांचा एक गट आहे. २०२२ साली या गटातील देश प्राथमिक शिक्षणासाठी दर विद्यार्थ्यामागे सरासरी ९,९००, तर माध्यमिक शिक्षणासाठी सरासरी ११,४०० खर्च करीत होते. या दोघांची सरासरी काढल्यास ती १०,६५० एवढी येते. २०२२ साली एक डॉलरचा भाव ७८.६० रुपये एवढा होता. म्हणून त्या काळात ८,३७,०९० एवढा सरासरी खर्च ही राष्ट्रे एका विद्यार्थ्यामागे करीत होती! त्या तुलनेत भारतात संबंधित काळात दर विद्यार्थ्यामागे सरासरी अवघा १२,७६८ एवढाच खर्च केला जात होता!! अशा परिस्थितीत आमच्या देशाची मुले जगातील मुलांशी कशी स्पर्धा करणार ?

**साधारणतः जगातील विकसित देश आपल्या उत्पन्नाच्या ६% खर्च शिक्षणावर खर्च करतात. २०२० साली अमेरिका आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) ६.५% खर्च शिक्षणावर करीत होती. दक्षिण अमेरिकेतील बोलेविया हा देश आपल्या सकल उत्पन्नाच्या ९.८४% खर्च शिक्षणावर करीत होता. आशिया खंडात सौदी अरेबिया हा देश आपल्या सकल उत्पन्नाच्या ७.८४% खर्च शिक्षणावर करतो, तर युरोपमध्ये ग्रीनलँड आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १०.५% खर्च शिक्षणावर करतो.** या दृष्टीने विचार केला तर भारतात काय आढळते? २०२४ साली भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे (जीडीपी) ३.९१ ट्रिलियन एवढे होते, असा अंदाज आहे. तत्कालीन रुपया-डॉलर विनिमय दर लक्षात घेता (१ डॉलर = ८३.६७ रुपये!) त्या वर्षी भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न साधारणपणे ३२७ लाख कोटी (अक्षरी रुपये तीनशे सत्तावीस लाख कोटी फक्त) इतके होते. या रकमेच्या सहा टक्के म्हणजे १९,६२,००० कोटी (अक्षरी रुपये एकोणीस लाख बासष्ट हजार कोटी)! याचा अर्थ, भारताच्या अर्थसंकल्पातील १९,६२,००० कोटी एवढा निधी आपण शिक्षणासाठी खर्च करायला हवा. आपण मात्र शिक्षणासाठी फक्त १,३९,२८९ कोटी एवढाच निधी ठेवला आहे. वस्तुतः, 'न शूद्राय मतिं दद्यान्नोच्छिष्टं न हविष्कृतम्' असा धर्मशास्त्रीय पुकारा केल्या गेलेल्या या देशात शिक्षणासाठी राष्ट्रीय सकल उत्पन्नाच्या निदान दहा टक्के तरी निधी शिक्षणावर खर्च करायला हवा. म्हणजे महात्मा फुले-क्रांतिज्योती सावित्रीमाता, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या देशात शिक्षणासाठी निदान ३२,७०,००० कोटी (अक्षरी रुपये बत्तीस लाख, सत्तर हजार कोटी) एवढा निधी राखून ठेवायला हवा! परंतु आपल्या केंद्र सरकारने शिक्षणासाठी जीडीपीच्या अर्ध्या टक्क्यांहून कमी निधी ठेवला आहे. याचे काय कारण आहे?

देशाच्या अर्थसंकल्पात शिक्षणासाठी ३२,७०,००० कोटी एवढ्या रकमेची तरतूद झाली तर लाखो शाळा, हजारो महाविद्यालये व शेकडो विद्यापीठे बांधली जातील! सुमारे ३३ कोटी लोकसंख्या असलेल्या अमेरिकेत ४,५०० विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्था आहेत. याउलट १४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात सुमारे १,५०० विद्यापीठे आहेत! या हिशोबाने पाहिल्यास भारतात किमान १८,००० विद्यापीठांची आवश्यकता आहे! या १८ हजार विद्यापीठांत लक्षावधी शिक्षक व शिक्षकेतर यांना रोजगार मिळेल. ही १८ हजार विद्यापीठे बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बांधकाम साहित्य लागेल. निव्वळ शैक्षणिक इन्फ्रास्ट्रक्चर बांधण्यातून मरगळलेल्या अर्थव्यवस्थेला जोरदार चालना मिळेल व तिथे कोट्यवधी मुली-मुले पिढ्यानपिढ्या शिकतील. सरकार देशाच्या भल्याचा असा साकल्याने विचार का करीत नाही ?

दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी 'किती वर्षे शिकावे?' हा देखील एक महत्त्वाचा निकष आहे. आपल्या भारतात सामान्य पदवीसाठी पंधरा वर्षे, तर व्यावसायिक पदवीसाठी सोळा वा सतरा वर्षे शिकावे लागते. ऑस्ट्रेलियात हा कालखंड एकवीस वर्षे आहे. न्यूझीलंड, ग्रीस, बेल्जियम या देशांत तो वीस वर्षे, तर स्वीडन, फिनलँड, डेन्मार्क, नेदरलँड्स या देशांत तो एकोणीस वर्षे आहे. नॉर्वे, स्पेन, अर्जेंटिना, तुर्कस्तान इथे तो अठरा वर्षे असून जर्मनी, युके, पोर्तुगाल, हाँगकाँग इथे सतरा वर्षे आहे. जी मुले वीस-एकवीस वर्षे शिक्षण घेतात त्यांचा शैक्षणिक पाया हा पंधरा-सोळा वर्षे शिक्षण घेणाऱ्या मुलांपेक्षा अधिक चांगला असणार आहे, हे निर्विवाद! देशाचे शैक्षणिक धोरण ठरविणाऱ्या विद्वज्जनांना हे का समजत नाही?

जगातील कोणत्याही नामवंत विद्यापीठांत शिकायचे असेल तर 'सॅट', 'जीआरई', 'जीमॅट', 'टोफेल' अशा मोजक्या परीक्षांपैकी अवघ्या दोन परीक्षा देऊन प्रवेश घेता येतो. आपल्याकडे मात्र एकाच शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी वेगवेगळ्या परीक्षा द्याव्या लागतात! ज्या विद्यापीठांची जागतिक क्रमवारी पहिल्या दोनशेमध्ये नाही, ती विद्यापीठे देशातील विद्यार्थ्यांची (व पालकांची देखील!) अशी शैक्षणिक, आर्थिक व मानसिक पिळवणूक का करीत आहेत? देशातील कोणत्याही विद्यापीठांतील कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी केवळ दोनच परीक्षा पुरेशा ठराव्यात, असे नियोजन 'युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशन' का करीत नाही?

**सबब, समस्त भारतीयांनी शैक्षणिक धोरणांत सुधारणा करण्यासाठी जोरदार आवाज उठवायला हवा. जेन झी आंदोलनाने दिशा दाखवली आहे. हाच धागा पकडून जनतेने जागोजागी आंदोलने करून लोकशाही मार्गाने शिक्षणव्यवस्था बदलायला हवी. त्यांतून जेन झी व जेन अल्फा बीटा पिढ्यांना खरे स्वातंत्र्य मिळेल!**

*...शुद्धोदन आहेर*

# पृथ्वीमातेला या दुर्जनांचा भार असह्य होत चाललाय; श्रीकृष्णाच्या कर्मसिद्धांताचं 'सुदर्शनचक्र', आता कुठे गरगरा फिरु लागलंय; त्याला, या 'Gen-Z' पिढीने गती प्राप्त करुन दिलीय...!!!

'डेंग झिआओ पिंग' यांनी वर्ष-१९७८मध्ये चीनच्या सत्तेवर येताच, देशातील सर्व संसाधने पणाला लाऊन 'राष्ट्र-निर्मिती'साठी...MIT, OXFORD, HARVARD, CAMBRIDGE इ. जगातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या बरोबरीची, किमान ३०-४० विद्यापीठे तयार करण्याला चालना देण्याचं महत्कार्य केलं; तरी, २१व्या शतकाची चाहूल लागलेल्या चिनी 'Gen-Millenials'ने...वर्ष-१९८९मध्ये डेंग यांनी केलेला 'तियानचौका'तील विद्यार्थ्यांचा नरसंहार, विस्मृतीच्या पडद्याआड कधि जाऊ दिला नाही...त्याचीच परिणती म्हणून, डेंग यांच्या आर्थिक-सुधारणांमुळे संसाधनसंपन्न व नवश्रीमंत झाल्यानंतरही, त्यांनी पुढे लग्न करणं आणि लग्न केलंच; तर, मुलं जन्माला घालायला नाकारणं, मोठ्याप्रमाणावर सुरु केलं...आणि, एकप्रकारे तियानमेन-चौक हत्याकांडाविषयीचा आपला कडवा रोष व्यक्त करत, एकप्रकारे त्याचा बदला घेत, एकूणच चिनी-व्यवस्थेला हादरा दिला! इथे एक इथोओपियन म्हण आवर्जून आठवते; ती म्हणजे, ''When the great lord passes, the wise peasant bows deeply and silently farts!'' तेव्हा, हे जे काही शिवराळ भाषेचं प्रयोजन आहे; ते 'Gen-Z'चं व्यवस्थेविरोधातील एक निषेधात्मक 'Farting' आहे... गेंड्याच्या कातडीचे असूनही भाजप-संघीय बनेल लोकांना, तेचं चांगलं झोंबावं?

**दिल्ली-पोलिसांच्या बरोबरीने साध्या वेषातल्या गुंडांकडून आंदोलकांना मारहाण...इलेक्ट्रिक करंट, खिळे लावलेल्या लाठ्या, पॅलेट गन्स इतकंच काय; तर, बिहारमध्ये एके-४७ चा गोळीबार करणाऱ्या दिल्लीश्वर 'गुजराथी-लॉबी'च्या मनात, चीनचा 'डेंग झिआओ पिंग' आहे; पण, तो 'तियानमेन-चौक हत्याकांड' घडवणारा आहे; जगातली सर्वोत्कृष्ट विद्यापीठे तयार करणारा नव्हे! पण, महत्त्वाचं हे की, तुम्ही उलटसुलट कुठल्याही अर्थाने 'डेंग झिआओ पिंग' होण्याचा प्रयत्न केलात की, ''ही नवतरुणपिढी, त्यांना जमेल त्या पद्धतीने, तुम्हाला धडा हा शिकवणारच!'' त्याचाच एक भाग, त्यांची आजची, तुमच्या नाकाम कर्तृत्त्वाला साजेशी काहीशी शिवराळ; पण, अंतःकरणाला थेट भिडणारी भाषा आहे.**

अंधभक्तांनो, भाजप-संघीय 'दलाल' पत्रकारांनो आणि संस्कृतिच्या तथाकथित ठेकेदारांनो...जातधर्म-विद्वेषातून तुम्ही 'निर्बुद्ध' झाला असलात, 'मेंदूविके' झाला असलात; तरी, ही नवतरुण पिढी जागी आहे. कंत्राटी-कामगार पद्धती'ची गुलामी आणि कॉर्पोरेटीय-दहशतवाद (Corporate-Terrorism) आजुबाजुला फसफसत असताना, ती आपल्या भवताली उघड्या डोळ्यांनी पहाते आहे...आणि म्हणूनच, भांडवली-व्यवस्थेनं बहुतांच्या जगण्याच्या केलेल्या असह्य कोंडीनं, रोज उठून त्या पिढीचं मस्तक संतापाने भणाणते आहे...त्याचाच, कुठेतरी हा उसळणारा भावनोद्रेक आहे!




...अंधभक्तांनो, आजच्या पंतप्रधानांची, 'Gen-Z'च्या बापजाद्यांशी तुलना करण्याची हिंमत करु नका...एकच 'पंतप्रधान' असा होता, ज्याला 'चाचा' (बापाच्या अगदी जवळचं नातं) म्हणून, या देशातल्या लहानग्यांनी आत्मीयतेनं संबोधलं होतं... जन्मदात्याखेरीज, आमचा एकच बाप होता व आजही मनाच्या कोंदणात आहे; तो म्हणजे आमचा 'राष्ट्रपिता' म. गांधी... आणि, या आभाळाएवढ्या दोन उत्तुंग व्यक्तिमत्त्वांच्या आसपासचीही योग्यता नसलेल्यांना, कोण म्हणणार आपला 'बाप'? त्यांच्या म्हणण्यानुसार, ते जन्माने स्वतःलाच भले 'नॉन-बायॉलॉजिकल' म्हणाले असले; तरी, १५ लाख खात्यात जमा करण्यासारख्या वा दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देण्यासारख्या खोट्या आश्वासनांवर, ते वर्ष-२०१४मध्ये निवडून आलेत...आणि, त्यानंतर एतच् मशिनमधल्या असंख्य तांत्रिक क्लृप्त्या, इलेक्टोरल-बॉण्ड्स वगैरेंच्या 'फ्रॉड'मधला पैसा, निवडणूक-आचारसंहिता व निवडणूक-प्रक्रियेचं बेधडक उल्लंघन करतच; ते पंतप्रधान म्हणून निवडून आणले गेलेत, बस्स्!

द्वेषाचं-हिंसेचं 'रानटी तण', सर्वत्र वाढवून-पसरवून मतांची शीघ्र बेगमी करणारं 'राजकारण' करायचं, बड्या भांडवलदार दोस्तांच्या (Crony-Capitalists) बोकांडी देशाची जल, जंगल, जमीन, बंदरं-विमानतळं वगैरे सगळी साधनसंपत्ती घालायची, लोकशाही संपवण्याच्या दिशेने निर्घृण पावलं टाकायची, बलात्काऱ्यांना-भ्रष्टाचाऱ्यांना-गुन्हेगारांना अभय द्यायचं...हीच एकमेव 'ओळख' असणाऱ्या या सरकारच्या म्होरक्यांना; 'शिमग्याच्या शिव्या' नाय हासडायच्या; तर, काय त्यांच्यासाठी, या संत्रस्त तरुणांनी जात्यावरच्या 'ओव्या' गायच्या? कुठल्या संस्कृती-रक्षणाच्या बेफजूल बाता मारतो आहोत आपण?? भारतीय-अध्यात्मानुसार 'दैत्य' म्हणजे, असे भयंकर अहंकारी-हिंसक लोक की, जे सज्जनांना छळतात, त्यांची संपत्ती लुबाडून श्रीमंत होतात, जे न्याय-निती-सत्याला पायदळी तुडवत प्रजेचं दमन करण्याकामी आसुरी शक्ति बाळगतात, ते सारेच... पूर्वी अशा दैत्यांच्या गुरुला 'शुक्राचार्य' म्हणायचे; आता, 'विश्वगुरु' म्हणतात, एवढाच काय तो फरक!

**यांची कार्यपद्धती काय; तर, देशी-विदेशी भांडवलदारांना चरायला रान मोकळं करण्यासाठी, कामगार-शेतकऱ्यांच्या माना पिरगळायच्या... त्यांच्या शांतिपूर्ण आंदोलनांकडे चक्क दुर्लक्ष करायचं, होता होईल तेवढी ती चिरडून टाकायचा प्रयत्न करायचा. हेच उद्योग 'Gen-Z'च्या आंदोलनाबाबत केले गेलेत.**

...म्हणूनच, तुम्हाला अगदी म. गांधींनी जरी येऊन सांगितलं की, ''बाबांनो 'साध्या'सोबतच 'साधन-शूचिता'ही बाळगली पाहिजे'', तरी त्या महात्म्याचे ते महान बोल, निदान आज तरी ऐकू नका! महात्मा, आपली 'हत्या' करणाऱ्यांना माफ करु शकतो; त्याला ते करु द्या...पण, त्या हत्येला, 'वध' संबोधणाऱ्या, या नीच-नराधमांना तुम्ही बिलकूल माफ करण्याचं कारण नाही!! गांधी-नेहरु घराण्यावर, अंधभक्तांकडून गेली दहापंधरा वर्षे अश्लाघ्य भाषेत टीका व त्यांना शिवीगाळ होत असताना... 'कॉंग्रेस की विधवा', '५० करोड की गर्लफ्रेंड', 'जर्सी गाय', 'कॉंग्रेस की शूर्पणखा', 'दीदी ओ दीदी' वगैरे नाक्यावरच्या टपराक मवाल्यासारखं बरळताना... 'दामोदरसुता' तुझा धर्म कुठे गेला होता? अटल बिहारी बाजपेयींना, 'हिराबासुता'ला 'राजधर्मा'ची आठवण तीव्रतेनं करुन द्याविशी वाटण्यासारखी परिस्थिती, ...पृष्ठ क्र. १२ वर

# झी उद्योग समूह, सुभाषचंद्र गोयल, ९९.९७ टक्के हेअरकट, अण्णा आंदोलन, बँकेवर दरोडा घालणारे दरोडेखोर... त्या दरोडेखोरांनी शेजारच्या गल्लीत घातलेला राडा...!!!

झी-उद्योग समूहाच्या सुभाषचंद्र यांनी, २२,००० कोटी रुपयांच्या गॅरंटीपैकी मी फक्त ६.२५ कोटी रुपये, म्हणजे फक्त ०.०३ टक्के रकमेची भरपाई करू शकतो, असे सांगितले. NCLT ने ती भरपाई मान्य केली.

म्हणजे, कर्जदारांना दिलेल्या कर्जाच्या ९९.९७ टक्के रकमेवर पाणी सोडावे लागणार आहे.

याबद्दलच्या बातम्या आणि चर्चा कालपरवा मेनस्ट्रीम आणि सोशल मीडियावर झाली. त्याची पुनरुक्ती नको करुया आणि जे काही घडत आहे; त्याची मुळे, अण्णा आंदोलनापर्यंत कशी पोहोचतात, ते समजून घेऊया.

अण्णा आंदोलनाचे देशाच्या राजकीय अर्थव्यवस्थेच्या वैचारिक फ्रेममध्ये योगदान काय?

देशात भ्रष्टाचार होताच. पण, अण्णा आंदोलनाने देशाच्या आर्थिक प्रश्नाबाबतचा पब्लिक डिस्कोर्स/सार्वजनिक चर्चाविश्व भ्रष्टाचार-केंद्री बनवला...बस्स, एकच निकष. दुसऱ्या शब्दात, एखादा आर्थिक-व्यवहार प्रचलित कायद्याला धरून असेल; तर, या अण्णा लोकांचे काहीही म्हणणे नाही. मग, त्या कायद्यातील तरतुदी कितीही कॉर्पोरेट भांडवलाला भरघोस सवलती देणाऱ्या, जनविरोधी, पर्यावरणविरोधी, गरीब नागरिकविरोधी असल्या; तरी, त्यावर चर्चा नाहीच!

...कारण, हे कायदे जनतेने निवडून दिलेल्या जनप्रतिनिधींनी बनलेल्या कायदेमंडळाने केलेले असतात. त्यावर टीका करायची म्हणजे देशद्रोह... सत्ताधारी पक्ष म्हणजे देश, त्यावर टीका म्हणजे देशद्रोह; असे Narrative बनवले गेलेय.

आर्थिक व्यवहारांचा ना अभ्यास, ना राजकीय अर्थव्यवस्थेतील पॉवर डायनॅमिक्स कसे चालते याचे ज्ञान ना कुवत. अशा अण्णांना पुढे करून कॉर्पोरेट भांडवलशाहीने अण्णा आंदोलन स्पॉन्सर केले. सामान्य नागरिकांचे राजकीय आर्थिक-शिक्षण करण्याचा, जो काही अवकाश शिल्लक होता; तो आक्रसून टाकला. मेनस्ट्रीम-मीडिया मालकीचा केला. त्यावर देखील आर्थिक कायद्यांची चिरफाड बंद केली.

अनेकोनेक कॉर्पोरेट भांडवल/बँकिंग/वित्त क्षेत्रासाठीचे आर्थिक कायदे, योजना, रेग्युलेटरी नियम बनवले गेले. त्या फ्रेममध्ये राहून अर्थव्यवस्थेतील सरप्लस, हजारो कोटी रुपये, कॉर्पोरेट क्षेत्र आणि पिरॅमिडच्या वरच्या भागात वेगाने ट्रान्सफर होऊ लागला.

मेक नो मिस्टेक...भ्रष्टाचाराची किंमत देखील सामान्य नागरिकच मोजत असतो. पण, भ्रष्टाचार म्हणजे राजकीय-अर्थव्यवस्था नव्हे. हायपोथेटिकली (मान्य करणे कठीण आहे) कल्पना करा देशात एका रुपयाचा भ्रष्टाचार नाहीये. तरी देखील दारिद्र्य, आर्थिक विषमता, पर्यावरणीय ऱ्हास टोकाचाच राहणार आहे.

त्यापैकी, एक भारतीय दिवाळखोरी कायदा (IBC) आणि त्याअंतर्गत, स्थापन झालेली NCLT...जो २०१६ मध्ये कार्यरत झाला. मोठ्या कॉर्पोरेटना खुले आम कायद्याला धरून, मोठ्या मोठ्या रकमा खिशात घालण्याचा राजमार्ग तयार झाला.

गेल्या दहा वर्षात NCLT ने मंजूर केलेले हेअरकट, बँकांची बुडालेली कर्जे, त्यांनी राइट-ऑफ केलेल्या कर्जाचे आकडे, केंद्र सरकारने दिलेले भागभांडवल...याचे लाखो कोटी रुपयांचे आकडे 'पब्लिक डोमेन'मध्ये आहेत.

९० टक्के 'हेअरकट' गटात शिरलेले सुभाषचंद्र लेटेस्ट आहेत. त्याआधी डेक्कन क्रोनिकल ९५ टक्के, व्हिडिओकॉन ९५ टक्के, सिनर्जी ९४ टक्के, उषदेव इंटरनॅशनल ९३ टक्के, सिवा इंडस्ट्रीज ९३ टक्के, रिलायन्स, अनिल अंबानी ९९ टक्के. आहेत...९० टक्के 'हेअरकट'च्या खाली तर, भली मोठी यादी आहे.

गेल्या दहा वर्षात NCLT कडे आलेल्या केसेसमध्ये सरासरी हेअरकट ६८ टक्के राहिला आहे. म्हणजे १०० रुपये देणे असेल; तर, कॉर्पोरेट-क्षेत्राने फक्त ३२ रुपये परतफेड केली आहे...या 'हेअरकट'ची एकूण रक्कम १० लाख कोटी रुपये आहे.

देशातील प्रत्येक थकीत कर्जाची केस छडछड कडे वर्ग होत नाही. इतरही अनेक पद्धतीने कर्जसंस्था/बँका आणि कर्ज घेतलेल्या कंपन्या यांच्यात सेटलमेंट होत असते. सर्व काही त्या त्या कायद्याला/योजनेला/रिझर्व्ह बँकेने आखून दिलेल्या फ्रेममध्ये होत असते. त्या मार्गाने, गेल्या दहा वर्षात अजून १५ लाख कोटी रुपये बँका/कर्जसंस्थांनी 'हेअरकट' सहन केला आहे.

पोस्ट मोठी होईल म्हणून थांबतो. पण, थोडक्यात एक अनुषंगिक मुद्दा. कर्ज थकवल्यानंतर एमएसएमई क्षेत्रातील लाखो उद्योग आणि प्रवर्तक, गृहकर्ज घेणारे, शैक्षणिक कर्ज घेणारे विद्यार्थी, मायक्रो-क्रेडिट घेणारे गरीब आणि अर्थात, कोट्यवधी शेतकरी...यांना काय नरक यातनांमध्ये ही सिस्टीम ढकलते? कित्येक जण फक्त, त्यामुळे आत्महत्या करताहेत...किती बेशरम, संवेदनशून्य आहे ही सिस्टीम !

कॉर्पोरेटधार्जिण्या आर्थिक-कायद्यांवर सार्वजनिक चर्चा न होता भ्रष्टाचारावर व्हाव्यात; हाच, कॉर्पोरेट-क्षेत्राचा राजकीय अजेंडा होता/राहील.

का कोणास ठाऊक. परवा 'ओटीटी'वर बघितलेला एक चित्रपट आठवला...भर शहरी वस्तीत असणाऱ्या बँकेच्या शाखेचे शटर बंद झाल्यावर, अंधार पडल्यावर दरोडेखोरांना बँकेत घुसून बँकेच्या सेफमधून पैसे लंपास करायचे असतात. कुलूप/सेफ वगैरे फोडताना आवाज होणार असतो. पोलीस चौकी जवळच असते. पोलीस आवाजाचा माग काढत येण्याची शक्यता असते. दरोडेखोर लोकल दादालोकांना पैसे देऊन, शेजारच्या गल्लीत जोरदार राडा घालायला सांगतात. मोठा गोंगाट, हाणामारी ऐकून पोलीस चौकीतील पोलीस त्या गल्लीत जातात...गोष्टीत साधर्म्य जाणवले तर, तो काही गोष्ट सांगणाऱ्याचा हेतू नाही!

***...संजीव चांदोरकर***

रस्ता, वीज, पाणी, शालोपयोगी-साहित्य, पोषक-आहार, शिकवणारे शिक्षक...या कशाचीही धड सोय नसलेल्या, मुरबाड तालुक्यातील (जि. ठाणे) आश्रमशाळेत शिकणाऱ्या एका चुणचुणीत मुलाने, देशातल्या सध्याच्या राजकीय परिस्थितीसंदर्भात विचारल्या गेलेल्या काही प्रश्नांची दिलेली मार्मिक उत्तरं...हा 'रवीशकुमार ऑफिशियल व्हिडीओ' पहाताना जरुर डोळ्याखालून घाला!

१) प्रश्न : ज्ञानेशकुमार, नावात दडलंय काय?

उत्तर : **EVM / SIR** सारखी 'वोटचोरी' आणि राममंदिराच्या देणग्यांमधील 'नोटचोरी'!

२) प्रश्न : रामजन्मभूमी अयोध्येच्या राममंदिरातून जर ५००० कोटींची लूट; तर, प्रस्तावित कृष्णजन्मभूमी मथुरेच्या कृष्णमंदिरातील संभाव्य लूट किती?



उत्तर : 'दामदुप्पट' म्हणजे, १०,००० कोटी; कारण, 'राम', हा विष्णुचा अपूर्ण 'अवतार'; तर, कृष्ण हा 'पुर्णावतार' म्हणून!

३) प्रश्न : 'मोहन यादव-कुटुंबियां'कडून शेकडो एकर, मनमोहक-मलईदार जमीन-खरेदी प्रकरणात, मध्यप्रदेशातील मुख्यमंत्री 'मोहन यादव' यांचा राजीनामा पं. नरेंद्र मोदी घेतील काय?

उत्तर : अजिबात नाही; कारण, मग त्यांना त्यांच्या दिवसाच्या १८-१८ तासांच्या कामात, तेवढाच एक उद्योग करावा लागेल... असं बघा की, याअगोदरच राजीनामा-मागणी रांगेत अरुणाचलचे मुख्यमंत्री पेमा खांडू, प. बंगालचे सम्राट चौधरी, आसामचे हिमंता बिस्वा सरमा उभे आहेत आणि त्यांच्या मागोमाग 'एपस्टिन-फाईल्स फेम' हरदीप पुरी, '**NEET-CBSE** परीक्षा-घोटाळा फेम' धर्मेंद्र प्रधान, हे केंद्रीय मंत्रिमहोदय देखील त्याच रांगेत उभे आहेत... याच 'गती व पद्धती'नुसार महाराष्ट्राचे विकास-पुरुष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, 'लोहपुरुष' अडवाणींप्रमाणे 'कॉंक्रिट-पुरुष' असलेले नितीन गडकरी; ज्यांच्या पुरुषत्वात हल्ली 'ईथेनॉल-पुरुषत्वा'चीही भर पडलीय...ही अशी एकेक करत सगळीच दिग्गज वजनदार मंडळी रांगेत रांगेत येणार; तेव्हा, मोदींनी काम तरी किती करायचं आणि कष्ट तरी किती घ्यायचे; त्याला काही मर्यादा नको? हा सगळा सारासार विचार करुनच, मी आपल्या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असं दिलंय!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



# रामरक्षा... कुणापासून? कशासाठी?

**''अयोध्येतील राम जन्मभूमी मंदिरात ''रामरक्षास्तोत्र'' त्रिकाळ म्हटलं जातं. तरी तिथे भक्तिभावानं दिलेल्या दान–देणग्या सुरक्षित राहिल्या नाहीत. उद्धव ठाकरे यांना ''रामरक्षा'' वाचता येत नाही. देवेंद्र फडणीसांना ''रामरक्षा'' तोंडपाठ आहे. हा माजी–आजी मुख्यमंत्र्यांमधील वेगळेपणा काय सांगतो?**

अयोध्येतील राम जन्मभूमी मंदिरातील ''चढावा चोरी''च्या निषेधार्थ ''शिवसेना''चा ''रामरक्षा महाआरती''चा महाराष्ट्रव्यापी कार्यक्रम सुरू झाला आहे. त्याची सुरुवात पक्ष–अध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मुंबईत, दादर येथील हनुमान मंदिराच्या समोर झाली. रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या या मंदिराचा इतिहास मजेशीर आहे. या मंदिराच्या समोर २०–२५ फुटांवर मशीद आहे; आणि मंदिराच्या पाठच्या भिंतीला चिटकून ख्रिस्त्यांचा ''क्रॉस'' आहे. बाजूला जैनांचे ''देरासर'' आणि कबुतरखाना आहे. या गोष्टी हनुमान मंदिराच्या आधीपासून आहेत. १९४० च्या सुमारास मुंबईत हिंदू–मुस्लिमांचे दंगे जोरात सुरू होते. ते दादर परिसरात पसरू नये, यासाठी दादरकर असलेल्या ''प्रबोधन''कार के. सी. ठाकरे यांनी मशिदीच्या समोर असलेल्या ''क्रॉस''च्या पाठीमागच्या जागेत शेंदूर फासून धोंडा ठेवला आणि थोड्याच दिवसांत त्या धोंड्याभोवती ''स्वयंभू मारुती'' मंदिर निर्माण झालं. त्याच्या ''आठवणी'' सांगताना, ''दादरच्या हनुमान मंदिराचा बाप मी आहे,'' असं त्यांनी लिहिलंय. असो. या मंदिराच्या समोर उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या ''रामरक्षा महाआरती'' कार्यक्रमासाठी पुरुष–महिला शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर सुरू झालेली ''रामरक्षा महाआरती''ची मालिका राज्याची उपराजधानी नागपूरपर्यंत आली आहे.

या कार्यक्रमाचा समाचार घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणालेत, **''उद्धव ठाकरे यांनी 'रामरक्षा'ची दोन पाने वाचून दाखवावीत. मला संपूर्ण 'रामरक्षा' तोंडपाठ आहे!'' ती असणारच! कारण 'रामरक्षा' बोलण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या 'शिवसेने'ला ब्राह्मण लागतो. त्याला त्या कामाची दक्षिणा द्यावी लागते. ही दक्षिणा वाचवायची असेल तर, उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना रामरक्षा पठणाची सुपारी जरूर द्यावी.**

**''संस्कृत भाषा आम्हासी कळेना, म्हणून ज्ञानदेवा दया आली,'' तेव्हा संत ज्ञानेश्वरांनी ''अमृताते पैजा जिंके'' अशा खात्रीने ''ज्ञानेश्वरी'', ''अमृतानुभव'', ''हरिपाठ'' हे ग्रंथ निर्माण केले. त्यामुळे संस्कृत भाषेचं ''देवभाषा'' म्हणून स्तोम माजवणाऱ्या पोटभऱ्या भूदेवांच्या भटशाहीच्या लबाड्या उघड्या पाडणारी ''वारकरी संत परंपरा'' निर्माण झाली. त्याला छेद देणाऱ्या; म्हणजे भटशाहीला पोषक ठरलेल्या संस्कृत भाषेत ''रामरक्षा'' आहे. त्याचे मूळ नाव ''श्रीरामरक्षास्तोत्र'' आहे. त्यात ३८ श्लोक आहेत. ते तोंडपाठ असल्याचे सांगताना, मुख्यमंत्र्यांनी देवभाषा आत्मसात असल्याचा भूदेवाचा पराक्रम सांगितलाय. हा पराक्रम शतकानुशतकांच्या सामाजिक गुलामीचा आहे.** त्याच्या चिंधड्या करण्याचं ऐतिहासिक कार्य ''प्रबोधन''कार ठाकरे यांनी केलं; तर त्याच्या उलट कार्य ''प्रबोधन''कारांचे नातू करीत आहेत, हे देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना दिलेल्या ''रामरक्षा'' पठणाच्या आव्हानातून स्पष्ट होते. पण त्याने 'भाजप–संघ' परिवारातल्या लोकांचं ''चढावा चोरी''चे पाप पलटी मारून 'पुण्य' होत नाही.

राम जन्मभूमी मंदिर निर्माणासाठी ६ डिसेंबर १९९२ रोजी ''विश्व हिंदू परिषद''ने अयोध्येत जमवलेल्या कारसेवकांनी ४५० वर्षे जुनी बाबरी मशीद जमीनदोस्त केली. त्याची प्रतिक्रिया देशभर उमटली. पण सर्वाधिक खुनखराबा मुंबईत झाला. हिंदू–मुस्लिम वस्त्या पेटल्या. त्यासरशी 'संघ–भाजप' परिवाराने हात झटकले. ''भाजप''चे तेव्हाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुंदरलाल भंडारी म्हणाले, ''बाबरी मशीद शिवसैनिकांनी पाडली!'' हे वस्तुस्थितीला धरून नव्हते. या आंदोलनासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसैनिकांना अयोध्येला जाण्याचा आदेश दिला नव्हता. ऐनवेळी पाठवलेले मनोहर जोशी, सुधीर जोशी, दत्ताजी नलावडे, गणेश नाईक, आनंद दिघे, रमेश मोरे हे नेते अयोध्येत घटनेच्या दुसऱ्या



दिवशी पोहोचले. कारण त्यांचे मुंबईहून निघालेले विमान खराब हवामानामुळे लखनऊ ऐवजी कोलकात्याला उतरले. **बाबरी पतनाच्या वेळेस संभाजीनगरचे तेव्हाचे खासदार मोरेश्वर सावे हजर होते. ते 'शिवसेने'शी संलग्न होते; पण ''अपक्ष'' म्हणून निवडून आले होते. ते ''भाजप'' नेते लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी यांच्या पाठीमागून फिरत होते. अशा स्थितीत कोणताही संबंध नसताना ''भाजप''च्या सुंदरलाल भंडारी यांनी, बाबरी पतनाचे खापर 'शिवसेने'च्या माथ्यावर फोडले. तेव्हा बाळासाहेब ठाकरे कडाडले, ''जर शिवसैनिकांनी बाबरी पाडली असेल, तर त्याचा मला अभिमान आहे!'' यातील ''जर–तर''च्या मध्ये वैचारिक स्पष्टता आहे.** संभाव्य न्यायालयीन संकटाला सामोरे जाण्याची धमक आहे. तसाच, ''करून सवरून नामानिराळं'' राहणाऱ्या 'संघ–भाजप' परिवाराच्या चलाखीविरोधातील संतापही आहे. या संतापातून त्यांनी ''बाबरी'च्या जागी आता गरिबांना विनामूल्य सेवा देणारं हॉस्पिटल बांधा,'' अशी सूचना केली होती. कारण त्यांना श्रद्धा–भक्तीच्या नावाखाली चालणाऱ्या, लूटमार करणाऱ्या भटी लबाड्या चांगल्याच ठाऊक होत्या.

तथापि, बाबरी पतनानंतर मुस्लिम कट्टरतावादाने उचल खाल्ली. दिल्लीच्या शाही इमामने ''बडा नमाज''चे आवाहन केले. त्यातून मुस्लिमांचे शक्तिप्रदर्शन होऊ लागले. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी हिंदुत्ववादी संघटनांनी ''महाआरती''चा कार्यक्रम सुरू झाला. त्यात ''शिवसेना''ने आघाडी घेतली होती. ती प्रभावी ठरली. या ''महाआरती''च्या यशस्वी प्रयोगाला आता ''रामरक्षा''ची जोड देण्यात आली आहे. पण ती सुसंगत नाही. ''रामरक्षा'' ही रामाची रक्षा करण्यासाठी नाही. अयोध्येतील राम जन्मभूमी मंदिरात ''रामरक्षा स्तोत्र'' त्रिकाळ म्हटलं जातं. तरी भक्तिभावानं दिलेलं दान तिथे सुरक्षित राहिलं नाही. म्हणजे, ''रामरक्षक'' नाही. मग ''चढावा चोरी''च्या निषेधासाठी सार्वजनिक ''रामरक्षा'' कशासाठी म्हणायची? सत्ताप्राप्तीसाठी राजकारणात घोळलेल्या रामाचा महिमा टिकवण्यासाठी? की कथित हिंदुत्वाच्या प्रदर्शनासाठी? ''रामरक्षा'' त्यासाठी निश्चितच नाही.

''रामरक्षा''ची निर्मिती साक्षात भगवान शंकराने केली, अशी पुराणकथा आहे. त्याचं असं झालं; शंकरास पत्नी पार्वतीने एकदा विचारले, ''जसे विष्णुसहस्र नामावली आहे; तसे प्रभू रामाचे एखादे स्तोत्र का नाही ?'' तेव्हा भगवान शंकरांनी पार्वतीस या 'रामरक्षा' स्तोत्राविषयी सांगितले. पण ते लिहिले भलत्यानेच! त्याचीही गंमतच आहे. वाल्मिकी ऋषींनी रामायणाची निर्मिती केली. हे १०० कोटी श्लोक असलेले ''रामायण'' आपल्याला मिळावे, असे देव, दानव आणि मानव यांना वाटू लागले. म्हणून रामायणाच्या प्राप्तीसाठी ते भगवान शंकरांकडे गेले. ते कुणाला मिळावे, यावरून त्यांच्यात खूप वाद झाले. अखेरीस शंकरांनी ''रामायण''ची सर्वांमध्ये समान वाटणी करण्याचे ठरवले. १०० ही सम संख्या असल्याने वाटणीमध्ये एक श्लोक उरलाच. हा श्लोक ''अनुष्टुप'' छंदात असल्याने त्यात ३२ अक्षरे होते. त्या अक्षरांची समान वाटणी झाल्यावर २ अक्षरे उरली. ती शंकरांनी स्वत:कडे ठेवली. ''ही दोन अक्षरे मी माझ्याकडेच ठेवतो,'' असे सांगून त्यांनी सर्वांना जाण्यास सांगितले सांगितले व ध्यानास बसले.

शंकरांनी २ अक्षरे स्वत:जवळ ठेवून घेतली, याचा अर्थ त्यात काहीतरी महत्त्वाचे असणार; या विचाराने देव, दानव, मानव शंकराचे ध्यान सुटण्याची वाट पाहत तिथेच थांबले. पण शंकराचे ध्यान काही सुटेना. परिणामी, कंटाळून एकामागे एक जाऊ लागले. एक ऋषी मात्र शेवटपर्यंत थांबले. अजून काही मिळावे, अशी त्यांची प्रबळ इच्छा होती. बराच वेळ वाट पाहिल्यावर त्यांना डुलकी लागली. नेमक्या त्याच वेळी शंकर ध्यानातून बाहेर आले. त्यांनी त्या ऋषींकडे बघितले. त्यांना त्यांच्या नेकीचे कौतुक वाटले. मग त्यांनी 'आशीर्वाद' म्हणून त्या ऋषींच्या स्वप्नात जाऊन 'रामरक्षा' सांगितली. थोड्या वेळाने ऋषींना जाग आली आणि... *पृष्ठ क्र. ११ वर*

शंकरांनी जे स्वप्नात सांगितले, त्यावरून त्यांनी 'रामरक्षा'ची निर्मिती केली. ते होते, 'बुधकौशिक' ऋषी! त्यांच्या स्वप्नातल्या अनुभवाचे वर्णन ''रामरक्षा''च्या पंधराव्या श्लोकात असे येते -

*आदिष्टवान्यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः ।।*
*तथा लिखितवान्प्रातः प्रबुध्दो बुधकौशिकः ।।*

या कथेतील दोन अक्षरे म्हणजे ''राम''! तो ''रामरक्षा''चा बीजमंत्र आहे. यातील रा = ओम नमो नारायण ; आणि म = ओम नमो शिवाय! भगवान विष्णू आणि भगवान शंकर; यांच्या विभक्त शक्ती एकत्र आल्याने; ''राम'' म्हणजे परब्रह्म निर्माण झाले आहे. म्हणजेच, विश्वातील सर्व सृष्टीचा उगम असणारे ''राम'' हे सर्वशक्तिमान देवाचे वैश्विक नाव आहे; असे अध्यात्म सांगते. म्हणूनच रामदास स्वामी लिखित ''लवथवती विक्राळा, ब्रह्मांडी माळा'' या शंकराच्या आरतीमध्ये अखेरीस -

*शतकोटीचे बीज, वाचे उच्चारी*
*रघुकुल तिलक नाम, दासा अंतरी*

असा उल्लेख करतात. यातील ''शतकोटीचे बीज'' म्हणजे ''राम''!

''श्रीरामरक्षास्तोत्र''चा आरंभ ''श्री गणेशाय नमः।'' असा विघ्नहर्ता गणपतीच्या स्तवनने झाला आहे. त्यापुढे स्तोत्राची देवता, ''श्रीसीतारामचन्द्रो देवता'' म्हणजे श्रीसीतेसह श्रीरामचंद्र, हे या मंत्रातील देवता असल्याचे सांगितले आहे. या स्तोत्राची रचना अनुष्टुप छंद/वृत्तात केली आहे; आणि ''सीता शक्तिः'' म्हणजे ''सीता'' ही स्तोत्राची मंत्र शक्ती आहे. ''श्रीरामचन्द्रप्रीत्यर्थे जपे विनियोगः।'' म्हणजे श्रीरामरक्षास्तोत्र मंत्रजपाचा उपयोग हा श्रीरामचंद्राची उपासना करण्यासाठी असल्याचे सुरुवातीला सांगितले आहे. या स्तोत्रात हनुमंत ''कीलकम'' स्थानी आहे. कारण हनुमंत हा वाऱ्याच्या वेगाने संचार करणारा, इंद्रियांवर जय मिळवणारा, बुद्धिमान लोकांत श्रेष्ठ असा, वायुपुत्र वानरसमुदायाचा मुख्य असूनसुद्धा श्रीरामाचा दूत आहे. त्यानेच श्रीरामाचे सामर्थ्य आणि देवत्व, ओळखले आहे. तो स्वतः सर्वसामर्थ्यवान असूनही श्रीरामचंद्राच्या चरण दास बनून सतत रामनामात असल्यामुळे राममय झाला आहे. यामुळेच बुधकौशिक ऋषींनी श्रीरामरक्षास्तोत्रात ''श्रीमद्हनुमान् कीलकम् ।'' असे म्हटले आहे. या स्तोत्राचे ''कीलक'' म्हणजे मंत्राची शक्ती बांधून ठेवणारे साधन, म्हणजेच ''किल्ली'' आहे. ते आरंभीच्या ओळींमध्ये सापडते आणि पुढे जाऊन या स्तोत्राचा गुह्य अर्थ उलगडत जातो.

**''रामरक्षा स्तोत्रा''तील श्लोक ४ ते ९ हे ''रामनाम कवच'' म्हणून ओळखले जातात. त्यात मानवी शरीरातील प्रत्येक अवयवांचे रक्षण करणारे मंत्र आहेत. त्याने संपूर्ण शरीरच रामनामे अभिमंत्रित होते. त्यामुळेच आजारी व्यक्तींना किंवा ऑपरेशन झालेल्या रुग्णांना ''रामरक्षा'' ऐकवली जाते. अशी आहे, बुधकौशिक ऋषींच्या कथित स्वप्नातून सुरू झालेल्या ''रामरक्षा''ची महती! ''पुराणातली वानगी पुराणात'' शोभून दिसतात. पण तीच राजकारणाची हत्यार झाली की, ''रामरक्षा'' की ''पक्षरक्षा'' असा प्रश्न विचारला जातो. ज्यांना ''रामरक्षा'' वाचता येत नाही, त्यांनी तर त्यातील शेवटचा ३८ वा श्लोक घोकत राहिलं तरी फलश्रुती होते. असे त्या श्लोकात सांगितले आहे.** तो श्लोक असा आहे -

*राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे।*
*सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने।।*

अर्थात, (शंकर पार्वतीला सांगतात-) रामनाम हे विष्णु सहस्रनामाशी समतुल्य आहे. मी सदैव 'राम, राम, राम' या रामाच्या नावाने रमतो.

''रामरक्षा'' ही अशी आहे. त्यातील रामनामाचं पावित्र्य सत्तापिपासू राजकारण्यांनी संपवलंय. म्हणूनच उत्तर प्रदेशचे ''भाजप'' आमदार व विधानसभा अध्यक्ष सतीश महाना म्हणालेत, ''ज्यांची श्रद्धा खोटी होती, त्यांच्या दान-देणग्यांची अयोध्येतील राम जन्मभूमी मंदिरातून चोरी झाली आहे!'' हा निर्लज्जपणा आहे. अशांची नालायकी सांगताना रामदास स्वामी म्हणतात -

*बहू नाम या रामनामी तुळेना।*
*अभाग्या नरा पामरा हे कळेना।*
*विषा औषध घेतले पार्वतीशे।*
*जिवा मानवा किंकरा कोण पूसे।।*

अर्थात, अनेक नाममंत्र आहेत; पण त्यांची तुलना रामनामाशी होऊ शकत नाही. ''रामनाम'' हे सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम आहे. पण हे अभागी पामरांना कळत नाही. साक्षात शंकरांनी ''हलाहल'' विषावर उतारा म्हणून रामनाम कंठी धारण केले आणि विषबाधा रोखली. शंकर भगवान जर रामनामाला इतके जपतात, तर बापुड्या मानवांची कथा काय?

या हरामी बापुड्यांनी ''रामनाम जपना, रामजी का चढावा अपना'' म्हणत खूप पुढची मजल मारली आहे. देशात देवपणाचा विक्रय जोरात आहे. तो रोखण्यात ''रामरक्षा''ची मंत्रशक्ती निकामी ठरलीय. पुराणकथा मेंदूचे दगड करतात. ''रामरक्षा'' तेवढंच करू शकते, हे ठाऊक असल्याने देवेंद्र फडणवीस यांना ''रामरक्षा'' तोंडपाठ आहे. त्याबाबतीत उद्धव ठाकरे सपाट आहेत, हे बरेच आहे! सत्ताधाऱ्यांनी लोकशाहीला रुग्णशय्येवर झोपवलं आहे. तिला ठिकठाक करण्यासाठी ''रामरक्षा'' नको; ''देशरक्षा''ची जागृती हवी.

... ***ज्ञानेश महाराव,*** ज्येष्ठ पत्रकार-संपादक
(प्रसिद्धी : दैनिक देशोन्नती आणि दैनिक आधुनिक केसरी/ रवि. १९ जुलै २०२६)

# शाळा की कुंभमेळा?

आज मी स्पष्ट बोलणार आहे. हृदयावर शस्त्रक्रिया करणारा एक डॉक्टर म्हणून तर बोलणारच आहे. पण, हा तर डॉक्टर माणूस, याला अर्थशास्त्रातले काय समजते, असा ग्रह कोणी करून घेऊ नये म्हणून हे देखील सांगतो की मी फिलॉसॉफीचा पदवीधर आणि अर्थशास्त्राचाही पदव्युत्तर विद्यार्थी राहिलो आहे. थोडक्यात, माननीय पंतप्रधान मोदींच्या शब्दांत सांगायचं म्हणजे मी ''दिमागी नक्षल'' आहे. आणि मी काटोलला नगरपरिषदेच्या प्राथमिक मराठी शाळेत शिकलेलो आहे. ज्याचा मला सार्थ अभिमान आहे. आणि म्हणून शिक्षण हा विषय मला जरा जास्त जिव्हाळ्याचा आहे.

माझ्या आधी थोर थोर लोकांनी कुंभमेळ्यावर टीका केली आहे. त्या अनेक लोकांमध्ये संत तुकाराम महाराज (''आली सिंहस्थ पर्वणी, न्हाव्या भटा झाली धणी''), महात्मा ज्योतीबा फुले (सार्वजनिक सत्यशोधक: समग्र वाङ्मय पान नंबर १४०, ''पृथ्वीवरील अनेक देशातील सर्व नद्या महासागरास मिळत असतां, त्यापैकी एका देशातील नदी पवित्र कशी होऊ शकेल?'') आणि ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कवी कुसुमाग्रज यांची ''सिंहस्थ'' ही कविता (''व्यर्थ गेला तुका। व्यर्थ ज्ञानेश्वर। संतांचे पुकार। वांझ झाले।।'') हे देखील आहेत.

माझ्या मते, कुंभमेळा ही एक कुप्रथा आहे. जशी सतीची चाल, केशवपन, कोंबड्या बकऱ्यांचा बळी देणे ही आहे तशीच-किंबहुना त्यापेक्षाही घातक. फरक एवढाच की, इथे बळी जातो तो मुक्या नदीचा. ती आपल्याला ओरडून सांगू शकत नाही. कोंबड्या-बकरे-सती गेलेल्या स्त्रिया ओरडू शकतात/शकत होत्या.




लाखो करोडो माणसांचे नदीच्या पात्रात एकाच वेळी उतरणे का घातक आहे? तर, मनुष्यप्राणी जेव्हा पाण्यात उतरतो तेव्हा त्याच्या देहाच्या वेगवेगळ्या मार्गातून घातक जिवाणू/विषाणू पाण्यात उत्सर्जित होतात.

१) गुदद्वारातून, ए. coli, ज्यामुळे पोटदुखी आणि रक्ताची हगवण होणे, असे आजार संभवतात. Shigella, Enterococci आणि Salmonella, ज्या'wio bacillary dysentery होते. याव्यतिरिक्त, Protozoans, Ogo Cryptosporidiuı, (जे एवढे निब्बर असतात की chlorinate करूनही मरत नाहीत.) Giardia duodenalis, ज्यामुळे दीर्घकाळ राहणारी रक्ताची हगवण होऊ शकते. ...*पृष्ठ क्र. १४ वर*

# या 'Gen-Z' पिढीने गती प्राप्त करुन दिलीय...!!!

...पृष्ठ क्र. ८ वरुन

कोणी निर्माण केली होती? आता मोठे साळसूदपणाचा आव आणतायत! यांच्या कुकर्मांची यादी, इतकी लांबलचक व मोठी आहे की, त्याचा एखादा 'इन्सायक्लोपिडीया'च तयार व्हावा!


**ऋषीमुनींनी पराकोटीच्या आध्यात्मिक उंचीवर नेलेला आणि शिवबा-संतांनी जोपासलेला, अखिल मानवतेची पूजा करणारा आणि निसर्गाची संरक्षण-संवर्धन करणारा महन्मंगल 'हिंदू धर्म' यांनी, पुरता नासवत रहायचं... आणि, त्यालाच काय ते बहुजनांनी 'हिंदुत्व-पिंदुत्व' म्हणत रहायचं? लक्षात ठेवा, न्याय-सत्याप्रती 'अंधत्व' बाळगत बरळणारी, ही अधर्मी-धर्मद्रोही भाजपाई मंडळी आहेत! पृथ्वीमातेला या दुर्जनांच्या पातकांचा भार असह्य होत चाललाय; श्रीकृष्णाच्या गीतेतील 'कर्मसिद्धांता'चं सुदर्शनचक्र, आता कुठे गरगरा फिरु लागलंय... त्याला, या 'Gen-Z' पिढीने गती प्राप्त करुन दिलीय! जातधर्मीय-विद्वेषातून दंगली पेटवून माणसांना मरु घालणारी ही जमात, ''चार पायाच्या पशूला, गोमाता'' म्हणण्याचा (सावरकरी-भाषा) पिढीजात ढोंगीपणा करत आलीय. ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' वरकरणी म्हणत...बलात्काऱ्यांना ही जमात संरक्षण देते, संसदेत पाठवते, त्यांचा जाहीर सत्कार करते; हे एवढ्या लवकर विसरायचं?**

माफिवीरांना क्रांतिवीर आणि, ''खाणकामासाठी जंगले उध्वस्त करत सुटलेल्या भांडवलदारांना आव्हान देत'', आदिवासींसाठी प्राणपणाने लढणाऱ्यांना 'नक्षलवादी' संबोधून वेचून वेचून ठार मारणारे...हे 'भांडवली-माथेफिरु' आहेत. त्यांना 'भांडवली-व्यवस्थे'तल्या ऐय्याशीचं जबर व्यसन जडलेलं असल्याने ('एपस्टिन-फाईल्स' स्मरणातून एवढ्यात गेलेल्या नसल्यास...तुम्ही पहाल की, लिंगपिसाट एपस्टिनशी एकदम घसट किंवा सलगी असलेले, आजही निलाजरेपणे मंत्रिमंडळात खुंटा गाडून बसलेले आहेत) आणि त्या विनाशकारी व्यसनात, हे आकण्ठ बुडालेले असल्याने... ते सामान्यांच्या दुःखाप्रती आणि निसर्ग-पर्यावरणाच्या ऱ्हासाप्रती ठार आंधळे, बहिरे झालेले आहेत. बक्कळ नफा कमावण्यासाठी, कंपन्या-कारखान्यांमधील रासायनिक प्रदूषके अर्धवट प्रक्रिया करुन अथवा अजिबात प्रक्रिया न करता... नद्यांमध्ये बेलाशक सोडून, हेच नद्या प्रदूषित करणार आणि हेच, ईशा-फाऊंडेशनसारख्या बेगडी धर्मसंप्रदायांना, नद्यांच्या शुद्धीकरणासाठी गाजावाजा करुन देणग्या देणार?

गेली ४ वर्षे जर्मनीचे भारतातील राजदूत असलेले डॉ. फिलीप अकेरमन यांनी चीनला जाता जाता, तमाम भारतीय शिक्षण-मंत्र्यांना, नुसते चिमटेच काढलेले नाहीत; तर, ''उच्चशिक्षण, ही सरकारची जबाबदारी आहे, असं आमचं सरकार मानतं; त्यामुळे, आमच्या देशातील बहुतांश विद्यापीठे, ही सरकारी तरी आहेत किंवा त्यांना आवश्यक निधी सरकार उपलब्ध करुन देतं'', असं म्हणत थेट कानशिलातच लगावलीय!

मूर्तिमंत वात्सल्याचा आदर्श असलेल्या महाराष्ट्राच्या सानेगुरुजींच्या आणि ''नफरत की बाजार में, मोहब्बत की दुकान'' थाटणाऱ्या राहुल गाधींच्या पावलावर पाऊल ठेवत...ती जंतरमंतरवरची अवघी तरुणाई, पोलिसांच्या लाठीमारात जखमी झालेल्या एकमेकांची विचारपूस करत जखमांवर मलमपट्टी करत होती...त्याच पोलिसांना अन्नपाणी आणि गुलाबाची फुलं देत होती; तेव्हा तिथे, दिल्ली-पोलिसांचं क्रौर्य ओशाळलं आणि जातधर्म, पंथप्रांत, लिंग-भाषा, गरीबी-श्रीमंतीचे सगळे भेदाभेद लंघून पुन्हा एकवार ममता-माणुसकी चिरंजिवी ठरली! ''खरा तो एकचि धर्म...जगाला प्रेम अर्पावे'', म्हणणारे साने गुरुजी शहाणे की, ''मुसलमान दिसता, तत्काळ त्याला झोडपावे'', असा अप्रत्यक्ष संदेश देणारे आणि इस्रायलच्या नृशंस-गुन्हेगार नेतान्याहुची उठसूठ गळाभेट घेणारे आपले बनावट 'विश्वगुरुजी' शहाणे...???

...लक्षात ठेवा, ''शिविगाळ करणं गुन्हा असेल'' तर,




**गेली ४ वर्षे जर्मनीचे भारतातील राजदूत असलेले डॉ. फिलीप अकेरमन यांनी चीनला जाता जाता, तमाम भारतीय शिक्षण-मंत्र्यांना, नुसते चिमटेच काढलेले नाहीत; तर, ''उच्चशिक्षण, ही सरकारची जबाबदारी आहे, असं आमचं सरकार मानतं; त्यामुळे, आमच्या देशातील बहुतांश विद्यापीठे, ही सरकारी तरी आहेत किंवा त्यांना आवश्यक निधी सरकार उपलब्ध करुन देतं'', असं म्हणत थेट कानशिलातच लगावलीय!**

तुमचे दिल्लीचे गुंडे पोलिसच नव्हे; तर, भारतातील एकजात 'पोलीसदल' तत्काळ बरखास्त करावं लागेल; तेव्हा, याद राखा! ज्यापद्धतीने व ज्यापद्धतीच्या शिव्या, पोलिसदलातील वरिष्ठ अधिकारी, आपल्या हाताखालच्या शिपायांना आणि पोलिस ठाण्यात अटक केलेल्यांना वा बोलावलेल्यांना देत असतात...त्या ऐकताना, एखाद्या पापभीरु नागरिकाचे कान ठार बहिरे होतील किंवा मेंदू साफ बधीर होईल!

**Gen-Zची भाषा कुणाला शिवराळ वाटत असेल; तर, खुशाल वाटो...ती भाषा आमच्या शिवरायांच्या काळापासूनची आहे आणि ''भले तर देऊ गांडीची ('कासेची' शब्द नंतर घुसवला गेला) लंगोटी...नाठाळाचे काठी देऊ माथा'' अशी, संत तुकारामांसारख्या रोकड्या साधुसंतांची आहे...आजच्यासारख्या, लाखो निर्बुद्धांचे बेगडी-भोंदू धर्मसंप्रदाय चालवणाऱ्यांची नव्हे! शुद्धतेचं अवडंबर सोबत घेऊन, संस्कृतिचं अवगुंठन लेवून बहुजनांना फसवणाऱ्या आणि त्यांना पिढ्या न् पिढ्या 'अस्पृश्यते'च्या अंधःकारात नासवणाऱ्या 'नाठाळां'ची, ती संभावित भाषा नव्हेच नव्हे!**

अशा रोखठोक भाषेची यांना एव्हढीच 'ॲलर्जी' असेल; तर, दिवसाचे चोवीस तास 'शिवराळ' भाषा वापरणारा, धमक्या देणारा... 'Modi "loves Trump, but he did not want people to misinterpret the word "love" in a way that might negatively affect Modi's political career'', अशी 'ऑपरेशन-सिंदूर' संदर्भातल्या ७२ वेळच्या बदनामीनंतर सरळसोट खिल्ली उडवणारा अमेरिकेचा अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांना चालतो... पण, आमची निधड्या छातीची पोरं चालत नाहीत? त्या बिनडोक कंगना राणावतला म्हणावं, ''तुझी हिंमत असेल तर, रात्री एकटी दिल्लीत फिरुन दाखव...पण म्हणावं, आंदोलनाच्या महिनाभरात मात्र, तू जंतरमंतर परिसरातून रात्री बिनधास्त मोकाट फिरु शकली असतीस; कारण, तेथील भारतीय Gen-Zची गर्दी, अस्सल संस्कारी होती...तुझ्या सिनेमातील भूमिकांसारखी आणि रंगरंगोटीसारखी 'नकली' नव्हती!''

**अंततः, एक गोष्ट हृदयाला घरं पाडणारी गोष्ट लक्षात घ्या...की, ''आजचं जगणं, पुर्वीच्या तुलनेत एवढं सुखसोयींनं भरलेलं असतानाही, २१ तरुण पोरं NEET पेपरफुटीमुळे आत्महत्या करतात''...याचं या निर्दयी लोकांना काहीच वाटत नाही? त्यामुळे, यांच्या निष्ठूर हृदयाला घरं पडणं सोडाच; ज्या सहजतेनं, हे गोरगरीबांची बुलडोझरने घरं पाडतात; तेवढ्याच सहजतेनं व निर्विकारपणे, ते या हृदयद्रावक घटनेकडे पहातात. लक्षात ठेवा, असा प्रत्येक तरुण जेव्हा तुमच्या 'व्यवस्थे'ची ही भयंकर अन्यायी, संवेदनबधीर अवस्था अनुभवतो... तेव्हा, तो केवळ वैफल्यग्रस्ततेतून आत्महत्या करत नसतो; तर, तुम्ही निर्माण केलेल्या नृशंस-शोषक भांडवली-व्यवस्थेला आणि ती व्यवस्था चालवणाऱ्या तुम्हा सर्वांना अक्षरशः ''लाथ मारुन, या जगातून निघून जात असतो''... त्या प्रत्येक ब्रह्महत्येचं 'महापातक', नकली 'लाल-भगवे टिळे' लावलेल्या यांच्या माथी आहे आणि कितीही प्रयत्न केले तरी, ते त्यांना कदापि पुसता येणार नाहीत...!!!**

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# झंडा ऊँचा रहे हमारा

**देशात निवडणुका होतात; शेतकरी, कामगार, बँक - LIC कर्मचारी, विरोधी पक्ष, तरुणाई वेगवेगळ्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून आंदोलनं- निदर्शनं करतात; तरीही लोकशाही संपली, असं का म्हटलं जातं?**

अभिनेत्री कंगना, ''नीट'' परीक्षेचा फुलफॉर्म माहिती नसलेले विनोदवीर प्रशांत दामले, ''नथुराम'' संचारी शरद पोंक्षे आणि ''४० पैसे पोस्ट''वाले भाड्याचे अंधभक्त; यांच्या बेवकुफीमुळे स्वातंत्र्याच्या अमृतकाळाची उजळणी करावी लागत नाही. हे तसे बरेच झाले! कारण ८० व्या स्वातंत्र्यदिनी देशातलं वर्तमान इतकं भयाण आहे की, त्याला ''मोदी सरकार''च्या आधीच्या इतिहासात बसवणे, हे स्वातंत्र्याला शरमिंदं करण्यासारखं आहे. अंधभक्तांचं म्हणणंच आहे की, ''भारताला 'खरे स्वातंत्र्य' हे १५ ऑगस्ट १९४७ ला मिळालेले नसून, ते एप्रिल २०१४ मध्ये 'मोदी सरकार' दिल्लीपती झाल्यापासून मिळाले आहे.'' ह्या अंधभक्तीने १९९८ ते २००४ मधील 'वाजपेयी सरकार'ही पारतंत्र्यात लोटलं आहे.

नेता अतिमहत्त्वाकांक्षी असला की, इतिहासाला नालायक ठरवणाऱ्या गोष्टी घडवून आणल्या जातात. आपली हुकूमत किती पक्की आहे, ते तपासण्यासाठी वरचेवर चाचण्या घेतल्या जातात. **'कोरोना भगाव'च्या निमित्ताने 'ताली-थाली बजाव! बत्ती बुझाव, दिया लगाव!' हे राष्ट्रीय कार्यक्रम झाले. आता ''जेन-झी''शी संवाद साधण्याचा कार्यक्रम सुरू आहे. ह्या उचापत्या हुकूमतीच्या तपासणीसाठीच कराव्या लागतात. ''कोरोना''च्या संकटातील ''ताली बजाव'' प्रयोग संकटात आत्मबल देणारा आध्यात्मिक प्रकार म्हणून खपवला गेला, तरी तो देशी नव्हता. ती विदेशी उचलेगिरी होती. याउलट, आता देशातल्या ''जेन-झी''शी संवाद प्रयोग सुरू झाला आहे. ''नीट'' परीक्षा पेपरफुटीनंतर देशभरातील संतापलेल्या तरुणाईने ज्याप्रकारे देशाचे ''जंतरमंतर'' केले, त्याने अनेक आरोप आणि घोटाळे निगरगट्टपणे पचवणारे ''मोदी सरकार''ही हादरले.** त्यांचे आंदोलन मोडून काढण्यासाठी अमानुषपणे सत्ताबळाचा वापर केला. पण अखेरीस नाक मुठीत धरून धर्मेंद्र प्रधान यांचा केंद्रीय शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा घ्यावा लागला. नरेंद्र मोदी हे २००२ ते २०१४ ह्या काळात गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्यानंतरची १२ वर्षे ते देशाचे प्रधानमंत्री आहेत. ह्या २४ वर्षांच्या काळात त्यांच्यावर मंत्रिमंडळातील सदस्याचा राजीनामा घेण्याची वेळ आली नव्हती. ती ''जेन-झीं''नी आणली.

असो. **गेल्या १२ वर्षांत क्रमाक्रमाने आणीबाणी लादत लोकशाहीच्या बुरख्याआडून हुकूमशाही प्रस्थापित केली जात आहे. लोकांनी काय खावं, काय पेहरावं, काय पाहावं, कसं राहावं, कसं बोलावं, काय शिकावं; त्याबाबतच्या सूचना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे दिल्या जात आहेत. रशिया, उत्तर कोरिया, तुर्कस्तान, हंगेरी, अर्जेंटिना, ब्राझील, थायलंड, नायझेरिया, पाकिस्तान, व्हेनेझुएला आदि देशांत हुकूमशाही अशीच चोरपावलांनी आली. त्याचा अभ्यास करून 'रा.स्व. संघा'ची 'थिंक टँक' आपल्या विचारधारेला सोयीस्कर ठरतील, अशा गोष्टी 'मोदी सरकार'द्वारे जनतेच्या माथी मारत आहे. ''संघ-भाजप'' परिवारातील नेते भारतातील कम्युनिस्टांची ''डावी वाळवी'' म्हणून हेटाळणी करतात; पण प्रत्यक्षात चीनमधील कम्युनिस्टांच्या हुकूमशाहीची अंमलबजावणी करतात.**

तथापि, ''फळांचा राजा'' असलेला आंबा कलमी असला; तरी प्रत्येक फळझाड हे कलमाने धरत नाही. त्यासाठी बियाही रुजवाव्या लागतात. ही समज नसल्याने 'थिंक टँक'ने लादलेली 'नोटाबंदी' फसली. 'कृषी सुधारणा कायदा' वर्षभराच्या शेतकरी आंदोलनामुळे मागे घ्यावा लागला. जम्मू-काश्मीरला स्वतंत्र राज्याचा दर्जा देणारे ३७० कलम हटवले; तरी काश्मीरची समस्या सुटलेली नाही. पुलवामातील दहशतवादी हल्ल्यात ४१ भारतीय जवानांचे बळी गेले. त्याचा बदला 'बालाकोट ऑपरेशन'मध्ये ३५० दहशतवादी मारल्याची 'बोलवा' उठवून २०१९ ची लोकसभा निवडणूक बहुमताने जिंकली. पण गुप्तहेर यंत्रणेला व सीमा सुरक्षेला गुंगारा देऊन पुलवामामध्ये दहशतवादी घुसले कसे, याचे उत्तर ७ वर्षे झाली, तरी 'मोदी सरकार'ला देता आलेले



नाही. अशीच दातखीळ गेल्या १२ वर्षांत देशातील १५२ पेपरफुटीबाबत बसली आहे.

**महागाई, बेरोजगारी, भूकबळी ह्या समस्यांनी देशात विक्राळ रूप धारण केलंय. शिक्षण आणि आरोग्य यंत्रणा मध्यमवर्गीयांनाही परवडेनाशी झालीय. त्यावर जे विचारवंत व त्या विषयातले तज्ज्ञ बोलतात-लिहितात, त्यांना मोदीविरोधी व ''देशद्रोही'' ठरवलं जातं. देशापुढच्या समस्यांचा अंदाज घेण्यासाठी आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी संविधानात्मक स्वायत्त संस्था आहेत.** कॅग = CAG (Comptroller and Auditor General of India) ही सरकारच्या गैरकारभारावर नजर ठेवणारी संस्था आहे. CVC (The Central Vigilance Commission) ही सरकारी नोकरशहांच्या गैरव्यवहारावर नजर ठेवणारी व कारवाई करणारी स्वायत्त संस्था आहे. RBI = 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' ही देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि महागाईवर नियंत्रण ठेवणारी स्वायत्त संस्था आहे. सध्या बोलबाला असणाऱ्या CBI, ED, IT (इन्कम टॅक्स) ह्याही स्वायत्त संस्था आहेत. पण गेल्या १२ वर्षांत ह्या सर्वच संस्था सत्तेच्या इशाऱ्यावर कारवायांच्या उठाबश्या काढत आहेत. विरोधी पक्षनेत्यांना लोकशाहीचे 'व्हिलन' ठरवण्यासाठी वापरल्या जात आहेत. वाढती महागाई, बेरोजगारी, घसरती अर्थव्यवस्था, वाढीव GST, शिक्षण व कामगार विषयक धोरण; या चर्चा संसदेत टाळल्या जात आहेत. याउलट, मंदिर-मठ प्रचारक-प्रसारक; बुवा-बापू-स्वामी यांच्या धंद्याला आणि बेकायदेशीर मालाला कमालीचा उठाव आहे. अयोध्येतील राम जन्मभूमी मंदिरातील करोडो किमतीच्या ''चढावा चोरी'' चौकशी समित्यांची प्रकरणं पांघरूणं घालून झाकली जात आहेत.

हिंदूंनी अधिक मुलं जन्माला घालावी आणि राष्ट्रकार्यासाठी 'विश्व हिंदू परिषद'ला द्यावीत, असे सांगण्यापर्यंतची मजल साधू-साध्वींनी मारलीय. देशात धर्मशाही आहे की लोकशाही, असा प्रश्न पडण्यासारखे वातावरण आहे. त्यामुळे 'हनुमान चालिसा' न्यायालयाच्या आदेशापेक्षा प्रभावी ठरतो. 'कश्मीर फाईल्स' हा चित्रपट देशातला धर्मवादी राजकारणाचा पीळ घट्ट करतो. ''धुरंधर'' चित्रपट खोटा इतिहास दाखवतो. मुस्लीम विद्यार्थिनींच्या गणवेषावरचा 'हिजाब' दंगली घडवून निवडणुका जिंकून देतो. देशात ४६ लाख मंदिरं आहेत. पण अयोध्येतील 'राम जन्मभूमी मंदिर' निर्माण हे देशाच्या आस्थेचे, श्रद्धेचे, प्रेरणेचे एकमेव मंदिर होते. संसदीय लोकशाहीत प्रथम आणि अंतिम श्रद्धा, आस्था, प्रेरणा, आदर हा 'संविधान'प्रती असला पाहिजे. तो सत्तेप्रती आहे. त्यामुळेच देशभर 'घर घर मोदी' हा कार्यक्रम (२०१८) राबवण्यात आला.

एकाधिकारशाहीची सत्ता देशात प्रथम स्वतःची अशी एक रेषा आखते. त्याआधारे लोकशाहीचे कायदे, नियम, प्रथा-परंपरा, संरचना मोठ्या खुबीने भिरकावून दिल्या जातात. दुसरे, देशातील निवडणुका आपल्याच पद्धतीने घेऊन त्या आपण जिंकायच्या; पण हे सर्व लोकशाही मार्गाने होत असल्याचा भास निर्माण करायचा; असा कार्यक्रम राबवला जातो. तिसरे, नागरिकांचे हक्क-अधिकार याबाबत जनजागृती करणाऱ्या व्यक्ती-संस्था-संघटनांच्या कामातील त्रुटी पुढे करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाया केल्या जातात. (याप्रकारे देशातील हजारो 'एनजीओ' बंद पाडण्यात आल्यात.) गेल्या १२ वर्षांत अशाच रीतीने मोदी-शहा सत्तेने संसदेत आणि लोकसेवा-संघटना पातळीवर विरोधी पक्ष शून्यवत करून टाकले आहेत. त्याचा फायदा अमेरिकेने भारतावर आपले निर्यातीचे मनमानी ''टेरिफ'' लादून घेतला.

**लोकशाही अशी एकपक्षीय असू शकत नाही! लोकशाहीच्या संरक्षणासाठी संविधानात्मक अधिकारात निर्माण झालेल्या स्वायत्त संस्था स्वतंत्रपणे काम करीत नसतील, तर लोकशाही संपली, असे का म्हणायचे नाही? देशात निवडणुका होतात; शेतकरी, कामगार, बँक-LIC कर्मचारी, विरोधी पक्ष, तरुणाई वेगवेगळ्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून आंदोलनं-निदर्शनं करतात; तरीही लोकशाही संपली, असं कसं म्हणायचं? हा संभ्रम हीच तर 'अच्छे दिन'ची करामत आहे. त्यात फसायचे नाही, असे आधी पक्के ठरवा; तरच वास्तव दिसेल.**

लोकशाहीची मदार ज्या संविधानिक संस्थांवर आहे व ज्यांना कारवाई करण्याचे घटनात्मक अधिकार आहेत; त्या संस्था अटीतटीच्या क्षणी नेमक्या सत्ताधारी पक्षाच्या बाजूनेच कशा निर्णय देतात? राजनारायण यांच्या विरुद्धच्या खटल्यात (१९७४) प्रधानमंत्री असलेल्या इंदिरा गांधी हरल्या होत्या.

# कोर्टात एकाएकी शांतता पसरली...

इंग्रज न्यायाधीशाने शेवटची संधी देत सांगितले:

हा फतवा तुमचा नाही एवढं म्हणा, तुम्हाला सन्मानाने सोडून दिले जाईल.

पण त्या महापुरुषाने स्वतःचा जीव वाचवण्यासाठी सत्याचा सौदा करण्यास स्पष्ट नकार दिला.!

होय! हा फतवा मीच लिहिला आहे... आणि आजही मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे!

हे होते अल्लामा फ़ज़्ल-ए-हक़ ख़ैराबादी, १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामातील एक महान विचारवंत, तत्त्वज्ञ, कवी आणि हुतात्मा.!

१८५७ च्या संघर्षात त्यांनी ब्रिटिश साम्राज्याविरोधात फतवा जारी केला. दिल्लीच्या जामा मशिदीतून इतर विद्वानांच्या स्वाक्षऱ्यांसह प्रसिद्ध झालेल्या या फतव्याने हजारो भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची ज्वाला पेटवली. त्यांना या क्रांतीचे जनकही संबोधले जाते.

दिल्ली स्वतंत्र झाल्यानंतर त्यांनी केवळ युद्धच लढले नाही, तर स्वतंत्र भारताच्या प्रशासकीय रचनेचा आराखडाही तयार केला. ते राष्ट्रीय एकात्मता आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे खंबीर समर्थक होते.

दिल्लीवर पुन्हा इंग्रजांचा ताबा झाल्यानंतरही त्यांनी हार मानली नाही. लखनौ, अवध आणि रोहिलखंड येथे लढा सुरूच ठेवला.



पण शेवटी त्यांना अटक झाली!

कोर्टात जेव्हा त्यांना जीव वाचवण्याची संधी मिळाली, तेव्हा ते ठामपणे म्हणाले:

होय, हा फतवा मीच लिहिला आहे आणि मी माझ्या भूमिकेवर आजवर ठाम आहे.

या निडर उत्तरामुळे इंग्रज संतापले. त्यांची सर्व मालमत्ता जप्त करून त्यांना 'काळ्या पाण्या'ची (अंदमान) कठोर शिक्षा सुनावण्यात आली. अंदमानच्या अंधारकोठडीत कागद आणि पेन हिसकावून घेतले, तरी त्यांनी खिडकीतील कोळशाने कपड्याच्या तुकड्यांवर इतिहास लिहिला. २० ऑगस्ट-१८६१ रोजी या महान स्वातंत्र्यसैनिकाने अंदमानमध्येच अंतिम श्वास घेतला.!

१८५७ च्या लढ्यात स्वतःचे सर्वस्व पणाला लावणाऱ्या अशा असीम धैर्याच्या आणि त्यागाच्या महानायकाला मानाचा मुजरा!

*...एक दुर्लक्षित स्वातंत्र्यवीर*

## झंडा ऊँचा रहे हमारा ...पृष्ठ क्र. १३ वरुन

हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने नाही, तर अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला होता. गेल्या १२ वर्षांत *...पृष्ठ क्र. १४ वर* असा एकही निर्णय सरकारविरोधात गेलेला का दिसत नाही? तसेच, 'विष्णु अवतारी' नरेंद्र मोदी प्रधानमंत्री झाल्यापासून लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी, विनय कटियार, उमा भारती, साध्वी ऋतंभरा हे 'हिंदू नेते' राजकारणातून अचानक गायब कसे झाले? आणि नरेंद्र मोदी हेच सर्वत्र एकमेव सरकारी छापाचे 'विश्वगुरू' कसे झाले?

१९७५ ते ७७ ह्या ३० महिन्यांत इंदिरा गांधींनी देशात 'आणीबाणी' जाहीर करून आपली एकाधिकारशाही आणली. पण त्यासाठी त्याचे दस्तावेजीकरण करून त्यावर त्यांनी राष्ट्रपतींची स्वाक्षरी घेतली होती. तसे धैर्य नरेंद्र मोदी का दाखवत नाहीत? कारण त्यांना लोकशाहीच्या पाठीवर स्वार होऊन आपल्या तंत्राने एकाधिकारशाही चालवायची आहे. मोदी प्रधानमंत्री झाल्यावर स्वतंत्र झालेला 'नया भारत' असा आहे. तो किती बनावट आहे, ते देशातील तरुणाईने दाखवून दिलेय. सत्तेची दहशत फुसकी असल्याचे दाखवून दिले. ही किमया करणारी **''उद्याची आशा'' देशाचे स्वातंत्र्य आणि लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी सज्ज करणे, हे ''भारतीय नागरिक'' म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य आहे. हे कर्तव्य बजावताना प्रशांत दामलेंसारखे विनोदवीर ''नागरिकत्वाची व्याख्या काय? व्याकरण काय?'' असे प्रश्न विचारतील. त्याकडे दुर्लक्ष करा आणि स्वातंत्र्यदिनी 'तिरंगा' उंचावत म्हणा –**

*स्वतंत्रता के भीषण रण में –*
*लखकर जोश बढे क्षण-क्षण में –*
*काँपे शत्रू देखकर मन में –*
*मिट जाए भय संकट सारा !*
*झंडा ऊँचा रहे हमारा !!*

*... ज्ञानेश महाराव,* ज्येष्ठ पत्रकार – संपादक

## शाळा की कुंभमेळा? ...पृष्ठ क्र. ११ वरुन

२) मानवाच्या कातडीतून Staphylococcus aurous आणि Pseudomonas aeruginosa, जे फोड आणि पुरळ असे, ज्याला आपण खाज आणि खरूज म्हणतो, तसे आजार संभवतात. कल्पना करा, लाखो-करोडो लोक एकत्र पाण्यात उतरत आहेत. तेही एकमेकांना चिकटून.

३) श्वसनविकार निर्माण करणारे viruses, लाळ, विष्ठा आणि उलटी यातून बाहेर पडणारे जंतू वेगळे. Hepatitis सारखे दुर्धर आणि मृत्यूला कारणीभूत ठरणारे आजारही ह्याच पाण्यातून पसरतात. आणि ह्या पाण्याला तीर्थ समजून करणे म्हणजे, काय म्हणावे ते तुम्हीच ठरवा. (ही माहिती ''Which organisms contaminate water when humans take a dip" हा प्रश्न विचारताक्षणी Internet वर वाचता येईल.)

या उपर, जे लोक नदीकाठी असलेल्या गावात राहतात, त्यांना माहिती असेल की गावाचा सगळ्यात सखल भाग म्हणजे नदीचे पात्र. गावातले सगळे रस्ते, ओहळ, नाले, नदीत उतरत असतात. आणि आजकाल पाऊस डिसेंबर महिन्यातही पडतो. करोडो लोक नाशकात येतील. नदीकाठी उभारलेले तात्पुरते संडास, विसरू नका. अजिबात विसरू नका.

आणि आता नदीचा विचार करा. तिच्या प्रवाहात शेकडो जीव एरवी मुकाटपणे नांदत असतात. आपण इतर मानवांसोबतच त्यांनाही धोक्यात आणत नाही का? पाण्यातल्या मासोळ्यांचे आवाज देखील आपल्याला ऐकू येत नसतात. आपण उत्सर्जित केलेल्या जंतूंमुळे त्यांना कुठले आजार होत असतील? आणि त्यातले काही मासे, हे लोकांचे अन्न आहेत. हेही लक्षात घ्या.

आता आपण यातील अर्थशास्त्राचा विचार करू. मला कल्पना नक्कीच आहे की कुंभमेळ्याच्या निमित्ताने आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होते. करोडो रुपये हस्तांतरित होतात, जे चांगलं आहे. पण अगदी उत्तम नाही. ही आर्थिक उलाढाल कायमस्वरूपी रोजगार निर्मिती करत नाही. त्या कुंभमेळ्यांत भारतात निर्माण झालेल्या थोड्याबहुत वस्तू नक्कीच असतील, पण मुख्यत्वेकरून चिनी बनावटीचा स्वस्त आणि बहुतेकदा टिकाऊ नसणारा माल, गरिबांच्या खिशाला झळ पोहोचवणारा असणार. साधारणतः गरीब लोक परिस्थितीमुळे जास्त देवभोळे असतात. परवडत नसतांना ते कर्जे काढतील आणि गंडवले जातील. महात्मा फुल्यांनी, गाडगेबाबांनी एवढं ओरडून ओरडून सांगितलं आहे, म्या पामराने काय बोलावे?

आजमितीला कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी सरकारी तिजोरीतून जाहीर झालेला आकडा ३४,००० कोटी रुपयांचा आहे. अजून कुंभमेळा लांब आहे, पण भ्रष्टाचार मात्र लग्नाच्या आधी जसे कुळ-कुळाचार प्रकार असतात ना, तसा सुरू झाला आहे.

महाराष्ट्र सरकारला एक सुवर्णसंधी चालून आली होती. प्रयागराजला १४४ वर्षांनंतर एक महाकुंभ परवाच होऊन गेला आहे. आणि योगी आदित्यनाथांनी सांगितले आहे की ८० कोटी लोकांनी तिथे स्नान केल्यामुळे जवळ जवळ अर्ध्याहून जास्त भारतीय लोकांच्या सात पिढ्यांना मोक्षप्राप्ती झालेलीच आहे. आता नाशकात परत गोदावरी नदीला कशाला संकटात टाकायचे? कशाला वृक्षतोड करायची? यापेक्षा आम्ही संकटात सापडलेल्या शालेय शिक्षणावर यावेळी भर देऊ. कुंभमेळ्याऐवजी शिक्षणावर हा खर्च करू. नवीन सुंदर आणि मजबूत शाळा बांधू, ज्यातून बांधकाम व्यवसायाला गती मिळेल, मोठ्या संख्येने शिक्षक नेमू, ज्यामुळे आणखी जास्त लोक कायमस्वरूपी रोजगारक्षम होतील आणि टॅक्सही भरतील. जनगणना, SRI, निवडणुका यासाठी वेगळे प्रशासकीय व्यवस्थापनासाठी खास प्रशिक्षण दिलेले वेगळे तरुण नेमू, ज्यामुळे शिक्षक त्यांच्या कामाकडे खूप वेळ देऊ शकतील, शिक्षकांना कायमस्वरूपी रोजगार तर मिळेलच, आणि प्राध्यापकांना देखील स्वतःच्याच पैशातून स्वतःलाच पगार देण्याची गरज भासणार नाही. आणि मुख्य म्हणजे ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांना शिक्षण मिळेल, तरुणांना रोजगार मिळेल. ही मुले शिकतील तर टिकतील – देश घडवतील.

मी ह्या संधीला ''सुवर्णसंधी'' का म्हणतो? कारण सरकार जवळ अतिप्रचंड बहुमत आहे. असा धाडसी निर्णय घेणे त्यांना सहज शक्य आहे.

आणखी जाता जाता एक फिलॉसॉफिकल गोष्ट सांगतो. ही कुंभमेळ्याची ''कुप्रथा'' जेव्हा लोकसंख्या कमी होती तेव्हा कदाचित ठीक असेल. आता मात्र नदीचा अंत पाहू नये. अनेक नद्या लुप्त झालेल्या आपण आजूबाजूला बघतो. सुंदर नद्यांचे घाणेरडे नाले केलेत, तर नव्या पिढ्यांना आपण काय सांगणार? नव्या पिढ्यांच्या गरजा आपणच समजून घ्यायला नकोत? एक trans humanism, नावाचा तर्कशास्त्रीय दृष्टिकोन आहे, Max More हा त्याचा उद्गाता म्हणता येईल. मानवी प्रयत्न सतत प्रगतीशील असायला हवेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान यामुळे मानवी क्षमतांमध्ये नेहमी सुधारणा व्हायला पाहिजे. भविष्यात अमर्याद आणि उत्तम दर्जाचे आयुष्य मिळेल असा विश्वास माणसाला असावा. एका कुठल्या वेळेवर नदीत स्नान केल्याने पापक्षालन होते, आणि सात पिढ्या स्वर्गात जातात, हा काय प्रकार आहे?

***– प्रशांत जोशी,*** मेलबर्न, ऑस्ट्रेलिया

# पंडित जवाहरलाल नेहरू

एका राष्ट्राचा पहिला स्वप्नकार.
एका उद्ध्वस्त देशाचा पहिला शिल्पकार.
एका जखमी संस्कृतीचा पहिला आधुनिक वैद्य.
१९४७ भारत स्वतंत्र झाला.
पण तो विजयी नव्हता.
तो रक्तबंबाळ होता.
फाळणीच्या आगीत भाजलेला.
मानवतेच्या किंकाळ्यांनी विदीर्ण झालेला.
रेल्वेगाड्या येत होत्या.
रस्ते भरले होते.
निर्वासितांनी.
आई हरवलेली.
मुलं हरवलेली.
घरं जळालेली.
विश्वास तुटलेला.
हा देश नेहरूंना वारशाने मिळाला नव्हता.
हा देश त्यांना अवशेषांत मिळाला होता.
दोनशे वर्षांच्या वसाहतवादी लुटीने
भारताची आर्थिक मज्जाच शोषून घेतली होती.
कारखाने नगण्य.
उद्योग अशक्त.
शेती मोडकळीस आलेली.
दुष्काळ सततचा.
भूक सर्वव्यापी.
रोग अनावर.
आयुर्मर्यादा तीस वर्षांच्या आसपास.
साक्षरता लाजिरवाणी.
लोकशाही?
राष्ट्रीय पातळीवर तिचा अनुभवच नव्हता.
शेकडो संस्थानं होती.
तुकडे तुकडे भारताचे.
भीती होती –
देश फुटेल.
लष्कर सत्ता घेईल.
धर्मांधता देश गिळंकृत करेल.
भारत गृहयुद्धात कोसळेल.
अशा वेळी
नेहरूंनी सिंहासन नाही स्वीकारले.
जबाबदारी स्वीकारली.
अराजकातून राष्ट्र उभं करण्याची.
त्यांनी संसद उभी केली.
सामंजस्याची संस्कृती उभी केली.
निवडणुका रुजवल्या.
घटना जपली.
न्यायालयांना स्वातंत्र्य दिलं.
लष्कराला नागरी सत्तेखाली ठेवलं.
आज अनेकांना हे साधं वाटतं.
कारण ते टिकून आहे.
पण त्या काळात
ते चमत्कारासारखं होतं.
आशिया.
आफ्रिका.
लॅटिन अमेरिका.
अनेक नवस्वतंत्र देश
हुकूमशाहीत कोसळले.
लष्करी बंडात हरवले.
लोकशाही गुदमरली.
भारत टिकला.
मतपेटी टिकली.
घटना टिकली.
कारण नेहरूंनी व्यक्तिपूजेपेक्षा
संस्था मोठ्या ठेवल्या.
त्यांनी धर्माधिष्ठित मार्ग नाकारला.
धर्मनिरपेक्षतेचा मार्ग स्वीकारला.
कारण फाळणीच्या जखमा त्यांनी जवळून पाहिल्या होत्या.
त्यांनी विज्ञानाला राष्ट्रधर्म मानलं.
अंधश्रद्धेला नाही.
विवेकाला मान दिला.
वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रतिष्ठा दिली.
मग उभ्या राहिल्या संस्था.
- Indian Institutes of Technology.
- Indian Institutes of Management.
- All India Institute of Medical Sciences.
- Council of Scientific and Industrial Research.
- Atomic Energy Commission.
तेव्हा भारत गरीब होता.
पण नेहरूंची दृष्टी गरीब नव्हती.
त्यांनी धरणं उभारली.
वीज प्रकल्प उभे केले.
स्टील कारखाने निर्माण केले.
अभियांत्रिकी उद्योग रुजवले.
ते म्हणाले –
ही आधुनिक भारताची मंदिरे आहेत.
त्या काळी अनेकांनी उपहास केला.
आज त्याच पायाभूत सुविधांवर
भारताची अर्थव्यवस्था उभी आहे.
होमी जे. भाभा
आणि विक्रम साराभाई
यांच्यासारख्या वैज्ञानिकांना
त्यांनी पाठबळ दिलं.
त्यातून पुढे
अणुऊर्जा कार्यक्रम उभा राहिला.
अंतराळ कार्यक्रम उभा राहिला.
ते फक्त राजकारणी नव्हते.
ते भविष्याचे वास्तुविशारद होते.
हो.
त्यांच्यावर टीका झाली.
होते अपयशही.
चीनबरोबरचे युद्ध
हा मोठा धक्का होता.
काश्मीर धोरणावर प्रश्न उपस्थित झाले.
परवाना–परमिट अर्थव्यवस्थेवर टीका झाली.
नोकरशाही फुगली.
कृषीक्रांती उशिरा आली.



इतिहासात देव नसतात.
मानव असतात.
मर्यादा असतात.
चुका असतात.
पण न्याय करायचा असेल
तर संदर्भ विसरून चालत नाही.
नेहरूंना तयार राष्ट्र मिळालं नव्हतं.
त्यांना तुटलेला भूभाग मिळाला होता.
भुकेला समाज मिळाला होता.
रक्तरंजित वर्तमान मिळालं होतं.
आणि अनिश्चित भविष्य.
त्या भग्नावशेषांतून
त्यांनी आधुनिक भारताचा सांगाडा उभा केला.
आजचा भारत –
त्याची संसद.
त्याची न्यायसंस्था.
त्याची वैज्ञानिक परंपरा.
त्याचे तंत्रज्ञान शिक्षण.
त्याचे सार्वजनिक उद्योग.
त्याची लोकशाही.
त्याची घटनात्मक चौकट –
या सर्वांच्या पायाभरणीत
नेहरूंचा घाम आहे.
नेहरूंची चिंता आहे.
नेहरूंची दूरदृष्टी आहे.
मृत्यूदिन हा केवळ स्मरणाचा दिवस नसतो.
तो प्रामाणिक मूल्यमापनाचा दिवस असतो.
आणि म्हणूनच –
पंडित जवाहरलाल नेहरूंचे मूल्यांकन
फक्त त्यांच्या चुका मोजून होऊ शकत नाही.
ते करावं लागतं
त्या जळालेल्या, विस्कटलेल्या, जखमी भारताकडे पाहून
जो त्यांनी १९४७ मध्ये स्वीकारला होता.
कारण काही नेते सत्ता चालवतात.
काही नेते राष्ट्र घडवतात.
नेहरू
दुसऱ्या प्रकारातले होते.

**...महेश झगडे**



# आदिवासी विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी राहुल गांधींचा आवाज

## आता मुख्यमंत्र्यांनी संवेदनशीलतेने पुढाकार घेण्याची वेळ!

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पुण्यामध्ये सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या उपोषणातील मागण्या तातडीने सोडवण्याची मागणी केली आहे. या पत्रातील मुख्य मुद्दे खालील प्रमाणे आहेत...

१) महाराष्ट्रातील आदिवासी विद्यार्थी विविध मागण्यांसाठी आणि वसतिगृहातील नियमांविरोधात १० दिवसांहून अधिक काळ उपोषण करत आहेत, याकडे दुर्लक्ष करू नये.

२) शासकीय वसतिगृहात राहण्यासाठी ३० वर्षांची वयोमर्यादा घालण्यात आली आहे, ज्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या किंवा परीक्षांची तयारी करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना वयोमर्यादेमुळे बाहेर पडावे लागत आहे.

३) अनेक वसतिगृहांमध्ये स्वच्छता, योग्य अन्न आणि वैद्यकीय सुविधांचा अभाव आहे. सर्पदंशासारख्या दुर्दैवी घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या मृत्यूची प्रकरणे समोर आली आहेत.

४) दीर्घ रजेवरून परतणाऱ्या विद्यार्थिनींची 'फिटनेस' सिद्ध करण्यासाठी प्रेग्नेंसी टेस्ट (गर्भावस्था चाचणी) आणि इतर वैद्यकीय चाचण्या घेतल्या जाण्याच्या प्रकारावर राहुल गांधींनी तीव्र आक्षेप घेतला आहे. हा नियम महिलांच्या सन्मानावर आघात करणारा असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

म्हणून राहुल गांधी यांनी मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे की, हे विद्यार्थी कोणतीही भिक किंवा खैरात मागत नसून त्यांचे हक्क मागत आहेत. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात लक्ष घालून विद्यार्थी प्रतिनिधींची स्वतः भेट घ्यावी आणि त्यांच्या समस्यांचे त्वरित निवारण करावे, अशी मागणी पत्रात केली आहे.

*...जगदीश काबरे* (JK)

**"हे विद्यार्थी कोणतीही भिक किंवा खैरात मागत नसून त्यांचे हक्क मागत आहेत. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात लक्ष घालून विद्यार्थी प्रतिनिधींची स्वतः भेट घ्यावी."**

**- राहुल गांधी**



**देवेंद्र फडणवीस जर संवेदनशील मुख्यमंत्री असतील, तर त्यांनी राहुल गांधींच्या विनंती पत्राकडे आवर्जून लक्ष द्यावे आणि मुलांशी संपर्क साधून त्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा. विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करणे त्यांना भविष्यात महागात पडणार आहे, हे त्यांनी विसरू नये.**

---

# पुण्यातील तरुणांचा स्तुत्य उपक्रम: गच्चीवरील शेती आणि गो-पालनातून पर्यावरण संवर्धन



"गृहसंकुलातील आपापल्या गच्चीवर (गच्चीवर पत्र्याची शेड टाकली नसल्यास) भाजीपाला शेती (विशेषतः, वेलवर्गीय भाजीपाला) केली जावी आणि प्रत्येक सोसायटीत (आपल्याकडे फारसे बंगले नसल्यानेच) किमान एक गाय किंवा गोवंश पाळला जावा; जेणेकरुन, गृहसंकुलातील सगळ्या स्वयंपाकघरांच्या उरलेल्या काडीकचऱ्यातील जनावरांना खाण्यायोग्य भाग, जागीच गुरांच्या मुखी लागेल (गाईला 'गोमाता' मानणाऱ्यांना पुण्य कमावण्याची आयती संधि लाभेल) व ओल्या कचर्यातील बहुतांश भाग सत्कारणी लागेल, डम्पिंग ग्राऊंडवरचा दबाव व रोगराई कमी होईल आणि रहिवाशांच्या कुंडीतल्या निसर्गासाठी किंवा गच्चीवरील शेतीसाठी उत्तम शेणखत उपलब्ध होईल (संबंधित महापालिका त्याकामी, 'मालमत्ता-करा'त आनंदाने सूट देईल). इमारतीच्या सर्वोच्च मजल्यावर रहाणाऱ्यांना उन्हाळ्यात छत असह्य तापण्याचा येणारा 'तापदायक' अनुभव नाहीसा होईल, हा एक त्यातला आनुषंगिक फायदा. शिवाय, थोडं नीट व्यवस्थापन केलं (सात्विक रसायनमुक्त भाजीपाला/दूध फ्लॅटधारकांना सवलतीच्या दरात विकण्यातून तेथील वॉचमन/स्वीपरला जोड व्यवसाय, उत्पन्न उपलब्ध होईल आणि गाय सांभाळण्याचं व भाजीपाला वाढवण्याचं वाढीव काम ते आनंदाने करु शकतील); तर, तान्ह्या मुलांना सकस-शुद्ध गाईचं दूध, आपल्याच गृहसंकुलात उपलब्ध होऊ शकेल"...ही संकल्पना, गेली कित्येक वर्ष मी व्यक्तिशः सातत्याने अनेक ठिकाणी मांडतोय...पण, कुणीही दाद द्यायला तयार नाही.

...चला, निदान पुण्यातल्या काही तरुणांनी, अशातऱ्हेचा काहीतरी विधायक उपक्रम हाती घेतलाय. त्यातून, सोसायटीत केवळ सार्वजनिक पूजा/गणेशोत्सव साजरा करण्यात 'इतिकर्तव्यता' मानणाऱ्यांना, अजून पुढे चार पावलं टाकण्याची स्फूर्ति मिळो, हीच सदिच्छा!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...**The First "Green-Political Party' Of India**)

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०